


१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड | बुधवार । दि. ८ जुलै २०२६ । अंक ३२ । पृष्ठे ८ । किंमत ५₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## सामान्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणारा नेता : प्रफुल्ल पाटील



आमच्यासाठी जयंत पाटील यांचा वाढदिवस म्हणजे केवळ एक कार्यक्रम नाही, तर तो एक भावनिक सोहळा आहे. त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिले की डोळे नकळत पाणावतात आणि अभिमानाने छाती भरून येते, असे भावनिक उद्‍गार अभिष्टचिंतन समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी काढले. •> पान २ वर

# जयंत पाटील ‘महाराष्ट्राचा संघर्षयोद्धा’

## आ. सतेज पाटील यांचे गौरवोद्गार | पीएनपी नाट्यगृहात अभिष्टचिंतन सोहळा




। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी त्यांना ‘महाराष्ट्राचा संघर्षयोद्धा’ अशी उपाधी दिली. ‘‘जयंत पाटील यांच्यासारखे नेतृत्व पुन्हा महाराष्ट्राला मिळाले पाहिजे. सत्ता नसतानाही त्यांचा दबदबा, आदर आणि प्रभाव कायम आहे. ५० वर्षांचा राजकीय अनुभव असलेले असे नेतृत्व शोधण्यासाठी गुगलची गरज नाही. रायगडच्या मातीतच असा नेता उभा आहे, असे म्हणत त्यांनी जयंत पाटील यांचा गौरव केला. सरकारला धारेवर धरणे, प्रश्न तडीस नेईपर्यंत पाठपुरावा करणे आणि कोणत्याही दबावापुढे न झुकणे हीच त्यांची खरी ओळख आहे,’’ असे गौरवोद्‍गार सतेज पाटील यांनी काढले. मंगळवारी (दि.७) अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात आयोजित शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. सविस्तर वृत्त पान ३ वर

### 1 गोंधळातही संयम, पण मुद्द्यावर ठाम

विधान परिषदेत अनेकदा गोंधळाचे वातावरण निर्माण व्हायचे. सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने उभे राहात असताना सभागृह सुरळीत चालविण्यासाठी मध्यस्थी करणारे नेतृत्व म्हणजे जयंत पाटील होते, असे सांगत सतेज पाटील म्हणाले की, त्यांनी अनेकदा संघर्ष मिटवला; पण स्वतःच्या भूमिकेवर किंवा जनतेच्या प्रश्नांवर कधीही माघार घेतली नाही. संघर्ष आणि सामंजस्य यांचा योग्य समतोल राखण्याची कला फार थोड्या नेत्यांकडे असते आणि जयंत पाटील त्यातील एक आहेत.

### 2 टक्केवारीत न अडकलेला नेता

आजच्या राजकारणात विचारांपेक्षा सत्तेला अधिक महत्त्व दिले जात असल्याची खंत व्यक्त करत सतेज पाटील म्हणाले की, अशा काळातही जयंत पाटील यांनी पुरोगामी विचारांची मशाल विझू दिली नाही. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा त्यांनी आपल्या राजकारणातून जपला आहे. आजच्या राजकारणासारखं टक्केवारीचं राजकारण त्यांनी कधीही केलं नाही. विचारांचे प्रदूषण वाढत असताना, ते विचारांनीच संपवावे लागेल, असे सांगत त्यांनी तरुणांनी जयंत पाटील यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

### 3 सहकार वाचविण्याचे मोठे योगदान

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा उल्लेख करत सतेज पाटील म्हणाले की, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सहकारी बँका अडचणीत आल्या; मात्र रायगडमध्ये सहकार जिवंत ठेवण्याचे मोठे श्रेय जयंत पाटील यांना जाते. सहकार हा केवळ बँकिंगचा विषय नसून, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे हजारो शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांना आधार मिळाला. त्यांच्या नेतृत्वामुळे रायगडची सहकार चळवळ राज्यासाठी आदर्श ठरली आहे

## विचारांशी एकनिष्ठ राहा



**शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे आवाहन**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

माझ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांपेक्षा एकच भेट द्या... आपला विचार पक्का ठेवा. विचाराशी प्रामाणिक राहा. हाच माझ्यासाठी सर्वात मोठा सन्मान असेल, असे भावनिक आवाहन शेकाप सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले. पीएनपी नाट्यगृहात आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाचा आढावा घेत कार्यकर्त्यांना वैचारिक राजकारणाची नाळ जपण्याचे आवाहन केले. सतरा वर्षांचा असताना पंचायत समितीचा सदस्य म्हणून जनतेने मला संधी दिली. आज मी एकाहत्तराव्या वर्षात प्रवेश केला आहे. या प्रवासात सत्ता आली, गेली; पदे मिळाली, गेली; पण गोरगरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेशी असलेली बांधिलकी कधीही सोडली नाही, असे ते म्हणाले. पावसामुळे वाढदिवसाचा सोहळा होईल की नाही, अशी शंका होती; मात्र राज्यभरातील कार्यकर्ते, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रेमामुळे हा सोहळा उत्साहात पार पडल्याचे सांगत त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. सविस्तर वृत्त पान ३ वर

## जयंत पाटील उदार अंतःकरणाचा माणूस : आ. नारायण पाटील



माझी आणि जयंत पाटील यांची ओळख सुमारे पंधरा वर्षांपूर्वी एका छोट्याशा कामानिमित्त झाली. त्या ओळखीचे नाते आजही तितक्याच आत्मीयतेने टिकून आहे. त्यांच्या सहवासात राहिल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे ते पदाने मोठे असले, तरी मनाने त्याहून मोठे आहेत. सत्तेपेक्षा माणुसकीला आणि राजकारणापेक्षा नात्यांना जपणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. संकटात धावून जाणारा, सामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसणारा आणि प्रत्येक कार्यकर्त्याला आपला माणूस मानणारा नेता म्हणजे जयंत पाटील. राज्याच्या •> पान २ वर

## भाई आमचे प्रेरणास्थान : चित्रलेखा पाटील



स्व. नारायण पाटील, स्व. दत्ता पाटील आणि स्व. प्रभाकर पाटील यांनी जपलेला संघर्षाचा वारसा जयंत पाटील यांनी तितक्याच ताकदीने पुढे नेला आहे. त्यांनी हजारो कार्यकर्त्यांना उभारी दिली, असंख्य कुटुंबांना आधार दिला आणि समाजसेवा हेच आपले ध्येय मानले. ‘ताईची सावली’सारख्या उपक्रमातून गरिबांना हक्काचे घर उभे करण्यासाठी मदतीचा हात दिला जात आहे, तर पर्यावरण संवर्धनासाठी ‘चित्रलेखाताई पाटील फॉर एन्व्हायर्नमेंट’च्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. भाईंच्या विचारांनी आणि संस्कारांनी आम्हाला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली आहे. आमच्यासाठी ते फक्त पक्षाचे नेते नाहीत, तर संकटात धीर देणारे, मार्ग दाखवणारे आणि प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे •> पान २ वर

## विकासकामे केली; पण जाहिरात नाही : ॲड. मानसी म्हात्रे



वयाच्या अवघ्या १७व्या वर्षी राजकारणात पाऊल ठेवून स्व. नारायण नागू पाटील, स्व. दत्ता पाटील आणि स्व. प्रभाकर पाटील यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे जयंत पाटील आजही त्याच निष्ठेने, त्याच जिद्दीने आणि तितक्याच प्रामाणिकपणे जनतेसाठी झटत आहेत. ७१ व्या वर्षातही त्यांच्या विचारांतील ताजेपणा, संघर्षाची धार आणि पक्षाप्रती असलेली निष्ठा किंचितही कमी झालेली नाही. म्हणूनच त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी अलिबागमध्ये जमलेला जनसागर हा केवळ वाढदिवसाचा उत्सव नसून, कार्यकर्त्यांच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा •> पान २ वर

## भाई म्हणजे दूरदृष्टी, विकास आणि माणुसकीचा संगम : ॲड. गौतम पाटील



शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी आयुष्य वेचणारे स्व. नारायण नागू पाटील यांचा विचारांचा वारसा आजही जयंत पाटील समर्थपणे पुढे नेत आहेत. लहानपणापासून स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. दत्ता पाटील यांचे समाजकारण आणि राजकारण जवळून पाहण्याचे भाग्य लाभले. त्याच संस्कारांची तिसरी पिढी म्हणून जयंत पाटील यांनी विकासाला नवी दिशा दिली, असे गौरवोद्‍गार ॲड. गौतम पाटील यांनी काढले. भाईंनी केवळ राजकारण केले नाही, तर सहकार, शिक्षण, पत्रकारिता आणि रोजगारनिर्मितीची मोठी चळवळ उभी केली. •> पान २ वर

## भरधाव कारने दहा जणांना चिरडले

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबईतील तळोजा सेक्टर-१० येथे भरधाव कारने आठ ते दहा जणांना चिरडल्याची धक्कादायक घटना घडली. या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला असून, पाच जण जखमी झाले आहेत. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नदीम खान असे अपघतामध्ये मृत व्यक्तीचे नाव आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, भरधाव कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस त्याचा शोध घेत असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे. जखमींमध्ये शराफुद्दीन शाकिर अली (४३), रामदुलारे रामसहाय गुप्ता (३७), सनी महेंद्र निषाद (३३), विघ्नेश संतोष पानसरे (१७) व मोहम्मद गुलफराज एमडी नसीम शेख (२८) यांचा समावेश आहे. दरम्यान, याच परिसरात भरधाव कारने आणखी पाच ते सहा वाहनांना धडक दिल्याची माहिती समोर आली आहे.

## नाणेघोळच्या डोंगराला भेगा

**ग्रामस्थांचे तातडीने स्थलांतर**

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर तालुक्यातील देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील नाणेघोळ गावाजवळील डोंगराला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याने संभाव्य भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर तहसीलदार कपिल घोरपडे यांच्या आदेशानुसार गावातील नागरिकांचे तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे.



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डोंगराच्या उतारावर सुमारे अर्धा किलोमीटर लांबीपर्यंत अर्धा ते एक फूट रुंदीच्या भेगा पडल्याची माहिती प्रशासनाला मिळाली. त्यानंतर महसूल, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पाहणीत डोंगराच्या भूभागावर अर्धवर्तुळाकार स्वरूपाच्या मोठ्या भेगा आढळून आल्याने संभाव्य भूस्खलनाचा धोका लक्षात घेऊन तातडीने स्थलांतराचा निर्णय घेण्यात आला.

तहसीलदार कपिल घोरपडे यांनी सांगितले की, •> पान २ वर

## दमदार पावसाने १९ धरणे तुडुंब

। रोहा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे नद्या आणि धरणांतील पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. अतिवृष्टीमुळे काही भागांत पूरस्थिती निर्माण झाली असली, तरी या पावसाने जिल्ह्यातील जलसाठा समाधानकारक पातळीवर पोहोचला आहे. सध्या जिल्ह्यातील २८ प्रमुख धरणांपैकी तब्बल १९ धरणे १०० टक्के भरली असून, एकूण जलसाठा ८४.३७ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे रायगडकरांची पाण्याची चिंता पूर्णपणे दूर झाली आहे.

पूर्ण क्षमतेने भरलेल्या धरणांमध्ये रोहा तालुक्यातील सुतारवाडी, सुधागड तालुक्यातील कोंडगाव, घोटवडे, कवेळे, उन्हेरे, म्हसळा तालुक्यातील पाभरे, संदेरी, महाड तालुक्यातील कोथुर्डे, खैरे, वरंध, खिंडवाडी, मुरूड तालुक्यातील फणसाड, तळा तालुक्यातील वावा, पेण तालुक्यातील आंबेघर, खालापूर तालुक्यातील भिलवले, कोलते-मोकाशी, डोणवत, पनवेल तालुक्यातील मोरबे आणि श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी या धरणांचा समावेश आहे.

याशिवाय पनवेल तालुक्यातील उसरण आणि बामणोली धरणांमध्ये सुमारे ९० टक्के, तर श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले, रानिवली तसेच कर्जत तालुक्यातील साळोख आणि अवसरे या धरणांमध्येही ५० टक्क्यांहून अधिक पाणी साठले आहे.

**चौलमळा जिल्हा परिषद शाळेची दयनीय अवस्था | शिक्षण विभागाचा फक्त प्रस्तावाचा खेळ**

## छताला गळती, वर्गात पाणी!

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची दुरवस्था झाली असून, धोकादायक झालेल्या इमारतीची कौले फुटल्याने वर्गखोल्यांना गळती लागली आहे. विद्यार्थ्यांना वर्गात साचलेल्या पाण्यातच शिक्षण घ्यावे लागत आहे. त्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. •> पान २ वर





**दोन वर्षांपासून दुरुस्तीकडे दुर्लक्ष**

### शिक्षणाधिकाऱ्यांना गांभीर्य नाही?

शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांना शाळेच्या दुरवस्थेबाबतची छायाचित्र दि. ३ जुलै रोजीच पाठविण्यात आली आहेत. परंतु, मॅडम कामात एवढ्या व्यस्त आहेत, की त्यांना आजतागायत शाळेच्या भीषणतेची दखल घ्यावीशी वाटली नाही. त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, फोन उचलण्याची तसदीही त्यांनी घेतली नाही.

## आज विधानभवनावर दिबाप्रेमींचा एल्गार



। पनवेल । प्रतिनिधी ।

राज्यात मुसळधार पावसाचा कहर सुरू असतानाही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी दिबाप्रेमी बुधवारी विधानभवनावर विराट मोर्चा काढणार आहेत. पाऊस, पूर किंवा प्रशासनाचा अडथळा यांची पर्वा न करता हजारो कार्यकर्ते मुंबईकडे कूच करणार असून, सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला जाणार आहे.

लोकनेते दिबाप्रेमी नामकरण समितीने या आंदोलनाची हाक दिली असून, ‘‘नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव द्या, अन्यथा •> पान २ वर

# महापुरातून ४६ जणांना जीवनदान

## जिते गावातील १६, तर हॉटेल हिमगौरीतील ३० नागरिकांची सुटका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील महापुरात अडकलेल्या एकूण ४६ नागरिकांना जिल्हा प्रशासनाने धाडसी बचाव मोहिमेद्वारे सुखरूप बाहेर काढले. मध्यरात्री मिळालेल्या मदतीच्या संदेशानंतर महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि आपदा मित्रांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत दोन स्वतंत्र बचाव मोहिमा यशस्वीपणे पूर्ण केल्या.

पहाटेच्या सुमारास जिते गावाला पुराच्या पाण्याचा वेढा पडून १६ नागरिक अडकल्याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर पेणचे तहसीलदार तान्हाजी शेजाळ यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, आपदा मित्र अभिकेत म्हात्रे, राजेश म्हात्रे तसेच महसूल विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत सर्व १६ नागरिकांची सुरक्षित सुटका केली.

ही मोहीम पूर्ण होताच मुंबई-गोवा महामार्गालगतच्या हॉटेल हिमगौरीमध्ये ३० जण पुराच्या पाण्यात अडकल्याचा संदेश प्राप्त झाला. पथकाने कोणतीही विश्रांती न घेता तातडीने दुसरी मोहीम हाती घेतली. दोरीच्या सहाय्याने सुरक्षित मार्ग तयार करत पुराच्या वेढ्यात अडकलेल्या सर्व ३० नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

या दोन्ही बचाव मोहिमा जिल्हाधिकारी किशन जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. जिल्हा नियंत्रण कक्ष, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि आपदा मित्र यांच्या समन्वयामुळे महापुराच्या संकटात अडकलेल्या एकूण ४६ नागरिकांना जीवनदान मिळाले.



## दोन गर्भवतींची थरारक सुटका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील रावे आणि तांबडशेत गावांना पुराच्या पाण्याने वेढा दिल्याने प्रसूतीच्या उंबरठ्यावर असलेल्या दोन नऊ महिन्यांच्या गर्भवती महिला जीवघेण्या परिस्थितीत अडकल्या होत्या. मात्र, जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेने आणि आपदा मित्र अभिकेत म्हात्रे व राजेश म्हात्रे यांच्या धाडसी बचावकार्यामुळे दोन्ही महिलांची सुखरूप सुटका करण्यात आली. वेळेत रुग्णालयात दाखल केल्याने माता आणि गर्भातील बाळांचे प्राण वाचले. रावे गावातील पायल राजेश पाटील (२३) यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता असल्याची माहिती मिळताच जिल्हाधिकारी किशन जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार आणि तहसील प्रशासनाने तातडीने बचाव मोहीम सुरू केली. पुरामुळे गावाचा संपर्क पूर्णपणे तुटल्याने रबर बोटीच्या साहाय्याने आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे यांनी जीवाची पर्वा न करता गावात प्रवेश केला. त्यांनी पायल पाटील यांच्यासह अन्य चार जणांना सुरक्षित बाहेर काढले. किनाऱ्यावर आधीच सज्ज ठेवलेल्या रुग्णवाहिकेतून त्यांना तातडीने पेण उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. पहिली मोहीम यशस्वी होताच तांबडशेत गावातून आणखी एका नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेचा मदतीचा संदेश प्रशासनाला मिळाला. कोणताही विलंब न करता त्याच पथकाने दुसरी बचाव मोहीम हाती घेतली आणि पुराच्या पाण्यातून मार्ग काढत त्या महिलेलाही सुरक्षित बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. बचाव मोहिमा यशस्वी करून आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे यांनी प्रसंगावधान, धाडस आणि सेवाभावाचा आदर्श घालून दिला. जिल्हा प्रशासनाच्या तत्पर नियोजन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या प्रभावी समन्वय आणि बचाव पथकाच्या धाडसामुळे दोन गर्भवती महिलांसह त्यांच्या गर्भातील बाळांचे प्राण वाचल्याने कौतुक होत आहे.

## मासे पकडताना युवकाचा बुडून मृत्यू

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कळंब ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत भागुचीवाडी येथील एका युवकाचा मासे पकडताना पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन दुर्दैवी मृत्यू झाला. नामदेव पारधी असे मृत युवकाचे नाव असून, स्थानिकांनी शोधमोहीम राबवून त्याचा मृतदेह नदीकाठावरून बाहेर काढला.



मिळालेल्या माहितीनुसार, नामदेव पारधी मासे पकडण्यासाठी कळंब रस्त्यालगतच्या नाल्याकाठी गेला होता. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नाल्यात अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. मासेमारी करत असताना वाढलेल्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्यात वाहून गेला. त्यावेळी तो एकटाच असल्याने घटना तात्काळ कोणाच्या लक्षात आली नाही.

सायंकाळी कळंब पुलाजवळ त्याची दुचाकी उभी असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली. स्थानिकांनी पोश्री नदी परिसरात शोध घेतला असता त्याचा मृतदेह नदीकाठी आढळला. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी पाठवला.

नामदेव पारधी हा एका सामाजिक संस्थेत सोशल वर्कर म्हणून कार्यरत होता. त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन लहान मुले, भाऊ आणि अन्य कुटुंबीय असा मोठा परिवार आहे. घरातील कर्ता व्यक्ती गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# चोरीच्या पैशांतून प्रेयसीला महागडी भेट

## राम मंदिर देणगी अपहारात आरोपीचा धक्कादायक खुलासे

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अयोध्येतील राम मंदिर देणगी अपहार प्रकरणात विशेष तपास पथकाच्या चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी अविनाश शुक्ला याच्या बँक खात्यात लाखो रुपयांचे व्यवहार आढळून आले असून, चोरीच्या पैशांतून त्याने प्रेयसीला महागडा आयफोन आणि दोन लाख रुपयांची आर्थिक मदत दिल्याचे तपासात उघड झाले आहे.

अविनाश शुक्ला याला राम मंदिरातील दान मोजणी केंद्रात कंत्राटी स्वरूपात दरमहा सुमारे १५ हजार रुपयांच्या वेतनावर नोकरी होती. मात्र, या अल्प पगारातही त्याने पत्नीच्या नावावर घर बांधले, महागडी ब्रेझा कार खरेदी केली आणि ऐषआरामाची जीवनशैली स्वीकारल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी त्याची कार जप्त केली असून, बँक खात्यातील सर्व व्यवहारांची चौकशी सुरू आहे.

चौकशीत अविनाशने चोरीच्या पैशांची आरोपींमध्ये वाटणी होत असल्याची कबुली दिली आहे. तसेच, मंदिरातील देणगीतील रक्कम अपहार करून ती विविध ठिकाणी खर्च केल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात आठ आरोपींना अटक करण्यात आली असून, विशेष तपास पथक पुढील तपास करत आहे.

## न्यायालयाचा कॉकरोच जनता पार्टीला दिलासा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

दिल्ली उच्च न्यायालयाने कॉकरोच जनता पार्टीला मोठा दिलासा देत पक्षाचे ब्लॉक करण्यात आलेले एक्स (पूर्वीचे ट्विटर) खाते पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात सांगितले की, नीट फेरपरीक्षेदरम्यान विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळ होऊ नये म्हणून खाते तात्पुरते ब्लॉक करण्यात आले होते. मात्र, परीक्षा पूर्ण झाल्याने ते कारण आता लागू राहात नसल्याचे नमूद करण्यात आले.

यावर न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी खाते तातडीने पूर्ववत करण्याचे आदेश दिले. कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनीही ही माहिती एक्सवरून जाहीर करत हा निर्णय अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि डिजिटल हक्कांचा विजय असल्याची प्रतिक्रिया दिली.


### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे भोईघर, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मुग्धा विश्वास जोशी यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे भोईघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भोईघर, ता.मुरुड | ९८ | क्षेत्र ०-८१-२०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-८२-२० | १४.९४ |
| वर नमुद मिळकतीमधील खाते क्र. ४०३, क्षेत्र ०-२०-०० हे.आर ., आकार ३.६८ रु. पै. ही जमिन मिळकत. | | | |

दिनांक :- ०७/०७/२०२६

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता:- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. नं. ९७६७०१०९०२



### जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

प्रस्ताव मृ. क्र. ६९/२०२६

१. रामचंद्र केरू गुगले,
रा. निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी देगाव, ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, देगाव, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने मृत्यू नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी राणीबाई केरू गुगले, रा. निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. ०३/०३/२०१३ रोजी मौजे निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

राणीबाई केरू गुगले, रा. निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. ०३/०३/२०१३ रोजी मौजे निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रामपंचायत देगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत देगाव, ता. माणगाव यांनी त्यांच्या मृत्यूची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच राणीबाई केरू गुगले, रा. निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या मृत्यूची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत देगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न राणीबाई केरू गुगले, रा. निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. ०३/०३/२०१३ रोजी मौजे निळगुण, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक : २९/०६/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार माणगाव



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) लुवना साजीद खान २) जयेश हरिश्चंद्र वर्तक ३) प्रवीणा हरिश्चंद्र वर्तक यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग | १५०९ | ०-३०-९७ बागायत<br>०-०१-०३ पो.ख.<br>०-३२-०० एकुण | १६.१९ |
| वर वर्णन केलेल्या जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे. | | | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक : ०७/०७/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८


पान १ वरून

## जयंत पाटील उदार अंतःकरणाचा माणूस : आ. नारायण पाटील

राजकारणात अशा उदार अंतःकरणाच्या नेतृत्वाची आज नितांत गरज आहे. त्यांनी स्वतःच्या कार्यातून एक वेगळी ओळख निर्माण केली असून, त्यांच्यासारखी माणसे समाजाला दिशा देणारी असतात,'' असे भावनिक उद्‌गार आमदार नारायण पाटील यांनी काढले.

## भाई आमचे प्रेरणास्थान : चित्रलेखा पाटील

राहणारे आधारवड आहेत. त्यांचे नेतृत्व अधिक मोठ्या जबाबदारीपर्यंत पोहोचावे, ही प्रत्येक कार्यकर्त्याची मनापासून इच्छा आहे,'' असे प्रतिपादन शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

## विकासकामे केली; पण जाहिरात नाही : ॲड. मानसी म्हात्रे

महासागर आहे. ''भाईंचा वाढदिवस हा केवळ अभिनंदनाचा दिवस नाही, तर प्रेरणा घेण्याचा दिवस आहे. त्यांनी कधी टक्केवारीचे राजकारण केले नाही, कधी पदासाठी किंवा पैशासाठी तडजोड केली नाही. हजारो विकासकामे केली, पण त्याची जाहिरात कधी केली नाही. अशा नेत्याच्या विचारांचा वारसा प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात पोहोचवला पाहिजे,'' असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडीप्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले. ''स्थानिक स्वराज्य संस्थांपासून संसदेपर्यंत लाल बावट्याचा विजय मिळवून देणे, हेच भाईंना खरी वाढदिवसाची भेट ठरेल. त्यांच्या स्वप्नातील विजय त्यांच्या चरणी अर्पण करेपर्यंत स्वस्थ बसायचे नाही, हा निर्धार प्रत्येक कार्यकर्त्याने आज करायला पाहिजे, असे आवाहनही ॲड. म्हात्रे यांनी केले.

## भाई म्हणजे दूरदृष्टी, विकास आणि माणुसकीचा संगम : ॲड. गौतम पाटील

शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी आयुष्य वेचणारे स्व. नारायण नागू पाटील यांचा विचारांचा वारसा आजही जयंत पाटील समर्थपणे पुढे नेत आहेत. लहानपणापासून स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. दत्ता पाटील यांचे समाजकारण आणि राजकारण जवळून पाहण्याचे भाग्य लाभले. त्याच संस्कारांची तिसरी पिढी म्हणून जयंत पाटील यांनी विकासाला नवी दिशा दिली, असे गौरवोद्‌गार ॲड. गौतम पाटील यांनी काढले. भाईंनी केवळ राजकारण केले नाही, तर सहकार, शिक्षण, पत्रकारिता आणि रोजगारनिर्मितीची मोठी चळवळ उभी केली.

त्यांनी लावलेली छोटी रोपे आज वटवृक्ष बनली आहेत. हजारो कुटुंबांच्या आयुष्याला त्यांनी आधार दिला. रायगडच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाची गंगा पोहोचवून गोरगरीबांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक संस्था सक्षम झाल्या आणि हजारो युवकांना रोजगाराची संधी मिळाली. विकासाचा विचार केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्षात उतरवणारे नेतृत्व म्हणजे जयंत पाटील, असेही पाटील म्हणाले.

## सामान्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणारा नेता : प्रफुल्ल पाटील

आमच्यासाठी जयंत पाटील यांचा वाढदिवस म्हणजे केवळ एक कार्यक्रम नाही, तर तो एक भावनिक सोहळा आहे. त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिले की डोळे नकळत पाणावतात आणि अभिमानाने छाती भरून येते, असे भावनिक उद्‌गार अभिष्टचिंतन समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी काढले.

गेली अनेक दशके विधिमंडळात आमदार म्हणून काम करताना भाईंनी सत्तेपेक्षा सर्वसामान्यांच्या न्यायाचा आवाज बुलंद केला. गरीबांच्या मुलांना शिक्षण मिळावे, आदिवासी वाड्या-पाड्यांपर्यंत विकास पोहोचावा, प्रत्येक घरात रस्ता, पाणी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी आयुष्य झोकून दिले. त्यांनी असंख्य विकासकामे केली; पण त्यावर स्वतःचे नाव कोरण्याचा किंवा प्रसिद्धीचा कधीही हव्यास ठेवला नाही. म्हणूनच जयंत पाटील हे केवळ नेते नाहीत, तर हजारो कुटुंबांचा आधार, संघर्षातील आशेचा किरण आणि सर्वसामान्यांच्या मनातील विश्वासाचे नाव असल्याचे पाटील यांनी सांगितले.

## नाणेघोळच्या डोंगराला भेगा

नाणेघोळ गावाचा यापूर्वीच संभाव्य नैसर्गिक आपत्तीग्रस्त गावांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असून, त्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

या पाहणीवेळी नायब तहसीलदार सानप, शाखा अभियंता कांबळे, विस्तार अधिकारी हंबीर, ग्रामपंचायत अधिकारी त्रिशिला गंभीरे, तलाठी जाधव, मंडळ अधिकारी मंगेश पवार, पुरवठा अधिकारी आबा जगताप तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## छताला गळती, वर्गात पाणी!

शिक्षण विभागाचा शाळेच्या दुरुस्तीकडे दोन वर्षांपासून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आहे.

चौलमळा येथील जिल्हा परिषदेची ही पहिली ते सातवीपर्यंत शाळा असून, दोन वर्गखोल्या आणि कार्यालयाचे कामकाज चालते. सद्यःस्थितीत वर्गखोल्यांना गळती लागल्याने विद्यार्थ्यांना पाण्यातच बसून शिक्षण घेण्याची वेळ आलेली आहे. शाळेत एकच शिक्षिका कार्यरत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून दुरुस्तीची मागणी करुनसुद्धा वर्गखोल्यांची दुरुस्ती होत नाही. छपराचे वासे कुजले असून, कौलांचे तुकडे छपरावर लटकत आहेत. खिडक्या तुटल्या असून, स्वयंपाकघराला मोठी गळती लागली आहे. मात्र, याकडे अद्याप कोणीच अधिकारी गांभीर्याने लक्ष देत नाही. फक्त प्रस्तावावर प्रस्ताव असा कागदांचा खेळ सुरू असल्याने पालकांनी संताप व्यक्त केला आहे.

सुरक्षित व दर्जेदार शिक्षणाचा हक्क असलेल्या या चिमुरड्यांना गळक्या छताखाली बसावे लागत आहे. त्यातच वर्गात साचलेले पाणी वर्गाबाहेर काढायचे कसे, असे विदारक चित्र पाहायला मिळाले. पालक आणि ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

राज्य शासनाकडून शाळांच्या पायाभूत सुविधांसाठी मोठा निधी दिला जात असल्याचा दावा केला जातो. मात्र, चौलमळा येथील घटनेने शिक्षण विभागाच्या दाव्यांची पोलखोल केली आहे. आता कुठे पावसाळा सुरू झाला असून, अद्याप चार महिन्यांचा पाऊस बाकी आहे. त्यामुळे शिक्षण विभाग आणि प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करावी, ही अपेक्षा करणेही चुकीचे आहे, असा संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे आता प्लास्टिक ताडपत्री टाकून वर्गखोल्यांची गळती थांबवावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

गेल्या दोन वर्षांपूर्वी शाळा दुरुस्ती प्रस्ताव पंचायत समिती शिक्षण विभागाकडे देऊनही दुरुस्ती होत नसल्याने व शाळेकडे दुर्लक्ष होत असल्याने आमच्या पाल्यांच्या जिवाचे नुकसान होऊ शकते, असा संताप चौल ग्रा.पं.चे माजी सदस्य शशिकांत म्हात्रे, ग्रामस्थ शैलेश नाईक, प्रशांत नाईक, राजेंद्र पाटील यांनी केला आहे.

**मी फक्त प्रस्ताव पाठवू शकतो!**

शाळेच्या दुरवस्थेबाबत गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांना कळविण्यात आले. गांभीर्य लक्षात घेता त्यांनी तासाभरात अलिबागवरुन चौल गाठले. परंतु, पाहणीदरम्यान त्यांनी माझ्याकडे निधी नाही, मी फक्त प्रस्ताव पाठवू शकतो, असे सांगितले. तर, जि.प. शिक्षण विभागाला अजून किती प्रस्ताव हवेत, की एखाद्याची जीव गेल्यावरच आपण याकडे लक्ष देणार, याबाबत शिक्षणाधिकारी दहितुले यांनी उत्तर द्यावे, अशी पालकांची मागणी आहे.

**प्रशासकांचे आश्वासन**

चौल ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. मागील दोन वर्षांपासून त्यांच्याकडे शाळेच्या दुरुस्तीबाबतचे विनंती अर्ज करण्यात आले आहेत. गेल्यावर्षीचा संपूर्ण पावसाळा याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे छपरावरील कौले फुटून वासेही कुजले आहेत. कधी वासा किंवा कौलाचा तुकडा पडेल, हे सांगता येत नाही. याबाबत प्रशासक वाडेकर मॅडम यांच्याशी संपर्क साधला असता, माझ्याकडे आताच चार्ज आला आहे, असे प्रामाणिक उत्तर देत, त्यांनी जबाबदारीने तात्काळ शाळेवर प्लास्टिकची तातडपत्री टाकण्याचे आश्वासने दिले. परंतु, अद्याप तातडपत्री देण्यात आलेली नाही. त्यामुळे शाळेची गळती कायम आहे.

## आज विधानभवनावर दिबाप्रेमींचा एल्गार

खुर्ची खाली करा,'' असा थेट इशारा सरकारला देण्यात आला आहे. पावसामुळे आंदोलन होणार नाही, असा समज करून घेणाऱ्यांना आगरी समाज आपल्या एकजुटीची ताकद दाखवेल, असा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.

मोर्चापूर्वी सकाळी १० वाजता पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यकर्ते एकत्र येणार असून, शिवरायांना अभिवादन करून दिबांच्या नावासाठी लढण्याची शपथ घेणार आहेत. त्यानंतर विधानभवनाच्या दिशेने मोर्चा काढण्यात येणार आहे.

या आंदोलनात उपोषणकर्त्या रश्मिता पोपेटा सहभागी होणार असून, त्यांच्यासह दिबाप्रेमी, विविध संघटना, कलाकार आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. माजी आमदार बाळाराम पाटील, कांतीलाल कडू, मनोहर भोईर, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, सर्वेश तरे, सत्यवान म्हात्रे आदींनी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.


### जाहीर आवाहन

दि. ०६/०७/२०२६

**धोकादायक व अतिधोकादायक इमारती तसेच सर्व गृहनिर्माण संस्थांसाठी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, इमारत मालक, भोगवटादार व रहिवाशांना कळविण्यात येते की, भारतीय हवामान विभागाने (IMD) रायगड जिल्ह्यासाठी दिनांक ०५ जुलै ते ०७ जुलै या दरम्यान ''रेड अलर्ट'' जारी केला असून अतिमुसळधार पाऊस, जोरदार वारे व स्थानिक पातळीवर अतिवृष्टी होण्याचा इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत जुन्या तसेच संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत इमारतींना धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २६४ अन्वये धोकादायक व अतिधोकादायक (C-१) म्हणून घोषित करण्यात आलेल्या इमारतींमधील सर्व रहिवाशांनी तात्काळ इमारत रिकामी करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे व महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या नोटिसा व सूचनांचे काटेकोर पालन करावे. याचबरोबर, पनवेल शहरात अलीकडील काळात धोकादायक म्हणून घोषित नसलेल्या काही इमारतींमध्येही छत/स्लॅब कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे इमारतीच्या वयाची पर्वा न करता सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था, इमारत मालक व व्यवस्थापन यांनी पात्र संरचनात्मक अभियंत्याकडून दरवर्षी इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून घेणे तसेच अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती, मजबुतीकरण व प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणे अत्यावश्यक आहे.

**धोकादायक इमारतीची प्रमुख लक्षणे :**

- बीम, स्लॅब, स्तंभ किंवा भिंतींना मोठे तडे जाणे.
- काँक्रीट निखळून लोखंडी सळया उघड्या दिसणे.
- स्तंभ, भिंती किंवा इमारत झुकलेली दिसणे.
- स्लॅब किंवा प्लास्टर मोठ्या प्रमाणात पडणे.
- इमारतीतून असामान्य आवाज येणे.
- पावसामुळे गळती होऊन संरचनात्मक नुकसान दिसून येणे.

**नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी :**

- धोकादायक इमारतीत वास्तव्य करू नये.
- इमारतीमध्ये धोक्याची लक्षणे दिसल्यास तात्काळ तज्ज्ञ संरचनात्मक अभियंत्याचा सल्ला घ्यावा.
- महानगरपालिकेच्या संबंधित विभागास माहिती द्यावी.
- आवश्यक असल्यास तात्काळ इमारत रिकामी करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

**महत्त्वाची सूचना**

धोकादायक इमारतींबाबत महानगरपालिकेने दिलेल्या आदेशांचे पालन न करणे, तसेच इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) न करणे किंवा अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती न करणे यामुळे कोणतीही दुर्घटना, छत/स्लॅब कोसळणे, इमारतीचा काही भाग किंवा संपूर्ण इमारत कोसळणे, जीवितहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधित इमारत मालक, विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था/सोसायटी, भोगवटादार व व्यवस्थापन पूर्णपणे जबाबदार राहील. अशा घटनांसाठी पनवेल महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**नागरिकांना कळकळीचे आवाहन**

**''आपला जीव अमूल्य आहे. कृपया इमारतींची नियमित संरचनात्मक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करा. धोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या करा आणि प्रशासनाला सहकार्य करा.''**

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दूरध्वनी / Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.
दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२७४५८०४०/४१/४२
Toll Free क्रमांक :- १८००-२२७-७०१

**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

पपा/अ.बां.नि./२४२६/जा.क्र. / २०२६

















# जयंत पाटील म्हणजे महाराष्ट्राचा संघर्षयोद्धा : सतेज पाटील

**(पान १ वरुन)** सतेज पाटील यांनी आपल्या भाषणात पाटील घराण्याच्या सामाजिक, सहकारी आणि राजकीय योगदानाचा गौरव करताना सांगितले की, स्वर्गीय नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील आणि ॲड. दत्ता पाटील यांनी घालून दिलेल्या पुरोगामी विचारांच्या वाटेवर जयंत पाटील यांनी आयुष्यभर चालण्याचा निर्धार केला. रायगडच्या अलिबाग तालुक्यातून सुरू झालेला त्यांचा प्रवास संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहे.

२००४पासून विधानपरिषदेतील त्यांचे कामकाज जवळून पाहिल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, शेतकरी कर्जमाफी, किसान मोर्चा, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनग्रस्त शेतकऱ्यांना न्याय, समाजकारण आणि सर्वसामान्यांचे प्रश्न यासाठी जयंत पाटील यांनी सातत्याने संघर्ष केला. कोणताही पक्ष सत्तेत असला तरी जयंत पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे सरकारला द्यावीच लागत होती. कारण, ते प्रश्न मांडण्यासाठी नव्हे, तर ते मार्गी लावण्यासाठी लढत असत, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी करमळाचे आ. नारायण पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, सार्वजनिक वाचनालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील, ॲड. राजेंद्र कोरडे, खजिनदार अतुल म्हात्रे, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, संतोष जंगम, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, अनिल पाटील, ॲड. परेश देशमुख, विजय गिदी, नागेश कुलकर्णी, अलिबाग पंचायत समिती सदस्या अंजली ठाकूर, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, रेवदंड्याचे उपसरपंच संतोष मोरे, ॲड. विजय पेढवी, उध्दव ठाकरे गटातील शिवसेनेचे रायगड जिल्ह्यातील नेते सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, काका ठाकूर, ॲड. उमेश ठाकूर, अभिष्टचिंतन समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, संजय पाटील, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे आदी जिल्हा, तालुका चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, वेगवेगळ्या आघाडींचे पदाधिकारी, सदस्य, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समितीचे माजी पदाधिकारी, अलिबाग नगरपरिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक सदस्य, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रातील पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, महिला, तरुण वर्ग यांच्यासह राज्यातील दिग्गज मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप जगे यांनी केले.

## कामांची पाटी न लावणारे आमदार

जयंत पाटील यांनी आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिले. ज्यांना मोठे केले त्यांनीही काही काळात साथ सोडली; मात्र त्यामुळे त्यांच्या जनाधारावर कोणताही परिणाम झाला नाही. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेली प्रचंड गर्दी हेच सिद्ध करते की, सत्ता नसली तरी लोकांच्या मनावर राज्य करणारे नेतृत्व म्हणजे जयंत पाटील, असे सतेज पाटील म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, आज पडद्यावर अनेकजण नायक बनण्याचा प्रयत्न करत आहेत; पण राज्य आणि रायगड जिल्ह्याचे खरे नायक जयंत पाटील आहेत, हे सर्वांना मान्य करावे लागेल. त्यांनी हजारो विकासकामे केली. मात्र, त्याचे श्रेय घेण्यासाठी पाट्या लावल्या नाहीत, तसेच मार्केटिंग केले नाही. अपयशानंतर पुन्हा उभे राहण्याची ताकद त्यांच्यात आहे आणि त्यामुळेच भविष्यातील सूर्य त्यांचाच असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## २०२९ ची आमदारकी शेकापचीच

कार्यकर्त्यांना संबोधित करताना सतेज पाटील यांनी आगामी निवडणुकांसाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. मतदार पुनरिक्षण मोहिमेत प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय सहभाग घ्यावा, अन्यथा आपल्या विचारांचे मतदार वगळले जाण्याचा धोका असल्याचा इशारा त्यांनी दिला. ''अलिबागमध्ये यापूर्वी ९० हजार मते मिळाली. पुढील निवडणुकीत दीड लाख मतांचे लक्ष्य ठेवून २०२९ च्या आमदारकीची मुहूर्तमेढ रायगडमधूनच रोवायची आहे. एका बाजूला दिखाऊ राजकारण आहे, तर दुसऱ्या बाजूला सर्वसामान्यांचे अश्रू पुसणारे राजकारण आहे. भविष्यात संस्कार, विचार आणि जनतेच्या प्रश्नांवर आधारित राजकारण उभे करायचे आहे,'' असे आवाहन त्यांनी केले.

# विचारांशी एकनिष्ठ राहा : जयंत पाटील

**(पान १ वरुन)** आयुष्यभर गोरगरीबांच्या हितासाठी काम करण्याचा प्रयत्न केला. अनेकांना संकटकाळात मदत केली. जिल्ह्यात शिक्षण, सहकार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील विविध संस्था उभ्या करून रोजगाराची दालने खुली केली. कारण, राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसते, तर समाज घडविण्यासाठी असते, असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीवर विश्वास

दिवंगत डी.वाय. पाटील यांच्याशी घरगुती संबंध असल्याचे सांगताना त्यांनी त्या माध्यमातून आमदार सतेज पाटील यांच्याशी राजकीय सहवास लाभल्याचे नमूद केले. महाविकास आघाडीतील सर्वात तरुण आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून सतेज पाटील यांच्याकडे पाहिले जाते. भविष्यातील राजकारणात अशाच विचारवंत नेतृत्वाची गरज आहे. देशाचे आणि महाराष्ट्राचे भले महाविकास आघाडीच करू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच काँग्रेसचे राहुल गांधीच पंतप्रधान व्हावेत, अशी इच्छाही जयंत पाटील यांनी व्यक्त केली.



## टक्केवारीच्या राजकारणामुळे विकासाची वाट लागली

सध्याच्या व्यवस्थेवर टीका करताना जयंत पाटील म्हणाले की, आज टक्केवारीचे राजकारण सुरू आहे. रस्त्यांच्या कामांमध्ये कमिशनखोरीला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे निकृष्ट दर्जाची कामे होत आहेत. वीस टन क्षमतेच्या रस्त्यावर तीस-चाळीस टन वजनाची वाहने धावत आहेत. मग रस्ते टिकणार कसे? ही परिस्थिती बदलण्याची ताकद तरुणांमध्येच असल्याचे सांगत त्यांनी युवकांना भ्रष्ट व्यवस्थेविरोधात उभे राहण्याचे आवाहन केले.

## पक्षाची विचारधारा गावागावात पोहोचवा

आपल्या भाषणात जयंत पाटील यांनी एक खंतही व्यक्त केली. ग्रामपंचायत सदस्यापासून खासदारापर्यंत अनेकांना राजकारणात मोठे केले. पण, त्यांच्यामध्ये वैचारिक बांधिलकी निर्माण करण्यात आपण कमी पडलो, ही खंत कायम राहील, असे ते म्हणाले. मात्र, ही उणीव आता भरून काढण्याची वेळ आली असून, प्रत्येक कार्यकर्त्याने पक्षाची विचारधारा गावागावात पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

## सरकार बदलण्याची तयारी करा

भाषणाच्या शेवटी कार्यकर्त्यांना उद्देशून जयंत पाटील म्हणाले, सत्तेच्या मोहाला बळी पडू नका. विचारांशी तडजोड करू नका. आपली विचारधारा ठाम ठेवा. हीच माझ्या वाढदिवसाची सर्वात मोठी भेट आहे. विचार जिवंत ठेवला, तर संघर्ष जिवंत राहील आणि संघर्ष जिवंत राहिला, तर परिवर्तन अटळ आहे. आता नव्या जोमाने कामाला लागा आणि जनतेच्या विश्वासाच्या जोरावर हे सरकार बदलण्याची तयारी करा, असे आवाहनही त्यांनी केले.

## विधानसभा-विधान परिषदेत आपलाच विजय

आगामी निवडणुकांकडे लक्ष वेधताना जयंत पाटील म्हणाले की, येणाऱ्या काळात विधान परिषद आणि विधानसभा या दोन्ही ठिकाणी आपल्या विचारांचा विजय झाला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आजपासूनच तयारीला लागावे. पक्षाची ताकद बूथ पातळीपर्यंत वाढविणे हीच काळाची गरज आहे. त्यांनी पुढे सांगितले की, बदल घडविण्यासाठी संघर्षाची नवी पद्धत स्वीकारावी लागेल. संघटन अधिक मजबूत करून जनतेमध्ये विश्वास निर्माण करणे, हेच पुढील ध्येय असावे.

## कार्यकर्त्यांच्या जल्लोषाने दुमदुमले अलिबाग

शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अलिबाग शहर लाल बावट्याच्या घोषणांनी आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहाने दुमदुमून गेले. सकाळी सात वाजल्यापासूनच त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांची रीघ लागली होती. त्यानंतर चेंढरे येथील पीएनपी नाट्यगृहात झालेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी सकाळी नऊपासूनच कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली. काही वेळातच संपूर्ण सभागृह खचाखच भरले. जयंत पाटील सभागृहात दाखल होताच उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात आणि ''जयंत पाटील आगे बढो, हम तुम्हारे साथ है, लाल बावट्याचा विजय असो'' अशा घोषणांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. कार्यक्रम संपेपर्यंत एकही कार्यकर्ता जागेवरून उठला नाही. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद, अभिमान आणि नव्या जोमाने पक्षासाठी काम करण्याचा उत्साह दिसून येत होता.

# भाईंमुळे अनेकांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली : मंदार वर्तक

''सहकार क्षेत्रात जयंत पाटील यांचे योगदान केवळ प्रशासकीय नाही, तर ते माणसे घडविणारे नेतृत्व आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मला आणि माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना झाला. त्यांच्या विश्वासामुळे अनेक सामान्य कुटुंबांना उभारी मिळाली, अनेक तरुणांच्या हाताला



रोजगार मिळाला आणि सहकार चळवळीला नवी ऊर्जा मिळाली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिसस्पर्श ज्याला लाभला, त्याच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आज जी नवी उंची प्राप्त झाली आहे, त्यामागे त्यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व आणि माणसांवर ठेवलेला विश्वास आहे. हजारो कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारे आणि संकटात आधार देणारे नेतृत्व म्हणून जयंत पाटील यांचे नाव कायम आदराने घेतले जाईल,'' असे गौरवोद्गार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी काढले.

# राहुल गांधींमुळे सत्ताधाऱ्यांची पळताभुई थोडी : जयंत पाटील

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

संसदेमध्ये विरोधी पक्षनेते राहुल गांधी ज्या पद्धतीने अभ्यासपूर्ण मांडणी करत आहेत, ती पाहता सत्ताधाऱ्यांकडे त्यांच्या प्रश्नांची कोणतीही उत्तरे उरलेली नाहीत. राहुल गांधी बोलायला उभे राहिले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देशातील महत्त्वाचे मंत्री सभागृह सोडून निघून जातात, ही वस्तुस्थिती आज संपूर्ण देश पाहात आहे, असा थेट आणि गंभीर आरोप शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला. केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर त्यांनी जोरदार हल्लाबोल करत देशात अपेक्षेपेक्षाही वेगाने राजकीय परिवर्तन होणार असल्याचा दावा केला.

जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एका दिमाखदार अभिष्टचिंतन सोहळ्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी देशातील राजकीय बदलांचे संकेत देत इंडिया आघाडीच्या वाढत्या प्रभावावर मोठा विश्वास व्यक्त केला.

देशातील सद्य राजकीय स्थितीवर बोलताना जयंत पाटील म्हणाले, मला पूर्ण आत्मविश्वास आहे की देशातील राजकीय वातावरण बदलणार आहे. मी नेहमीच माध्यमांशी बोलताना हे सांगत आलो आहे. परंतु, सध्या ज्या गतीने हे बदल घडतील असे मला वाटत होते, त्यापेक्षाही अधिक वेगाने आता बदल घडून येतील. देशात विरोध अधिक तीव्र होत असून, सध्या समोर येत असलेले विविध घोटाळे अत्यंत भयंकर आणि टोकाचे आहेत. हे घोटाळे समोर आल्यानंतर काम अधिक वेगळ्या पद्धतीने आणि गतीने होईल. इंडिया आघाडीचे सदस्य म्हणून संसदेतील अनुभवाचा दाखला देत जयंत पाटील यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भूमिकेचे विशेष कौतुक केले.

ते म्हणाले, राहुल गांधी ज्या अभ्यासूपणे संसदेत आणि पार्लमेंटच्या बैठकांमध्ये काम करत आहेत, ते कौतुकास्पद आहे. जेव्हा 'इंडिया' आघाडीमध्ये विविध विषयांवर चर्चा होते, तेव्हा राहुल गांधी अत्यंत व्यापक आणि प्रभावीपणे शेवटचा विचार मांडतात. त्यांच्या या भूमिकेमध्ये सर्वसामान्य, गरीब आणि बहुजन समाजाचे हित कसे साधता येईल, याची एक प्रामाणिक तळमळ दिसून येते.

राहुल गांधी यांच्या संसदेतील भाषणांना आणि त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना ज्या पद्धतीने प्रसिद्धी मिळायला हवी होती, तशी ती मिळत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# सुरक्षितता मिसिंग...

रविवार आणि सोमवारच्या पावसाने मुंबई, पुणे, रायगडमध्ये हाहाकार माजवला. खंडाळा घाटात रेल्वे आणि रस्ते अशा दोन्ही मार्गांवर दरड कोसळली. मुंबईहून पुण्याकडे जाणारे नवे आणि जुने दोन्ही रस्ते बंद करावे लागले. यातला मिसिंग लिंकवरची दरड हा सर्वात भयानक प्रकार होता. मुंबई पुणे एक्स्प्रेसवेवर लोकांचा वेळ काही मिनिटांचा वेळ वाचवण्यासाठी वाट्टेल तसे डोंगर फोडण्यात आले. धरणाच्या उंचीवर बोगदा, सर्वात उंच पूल असे काय काय करण्यात आले. पण ते करताना निसर्गाचा किती विचार करण्यात आला अशी शंका आता निर्माण झाली आहे. वास्तविक ही शंका आधीपासून होतीच. कृषीवलच्या या स्तंभामधून आम्ही ती अनेकदा व्यक्त केली आहे. तिचा प्रत्यक्ष पडताळा सोमवारी आला. या लिंकवर तब्बल १०० टन वजनाची दरड कोसळली. लिंकच्या खंडाळा प्रवेशद्वाराच्या कमानीचा भाग कोसळला. बोगद्यात पाण्याचे धबधबे वाहू लागले. या मिसिंग लिंकचे उद्घाटन होऊन जेमतेम दोन महिने झाले आहेत. उद्घाटनाचा जंगी कार्यक्रम ऐन घाटात घेण्यात आला आणि तेव्हा वाहतुकीची कोंडी करण्यात आली. त्यावेळी या रस्त्याचे नाव आता कनेक्टिंग लिंक असे मुख्यमंत्री म्हणाले. पण ही कनेक्टिंग लिंक राजकारणी, बिल्डर, कंत्राटदार यांचीच कनेक्टिंग लिंक अधिक आहे की काय असा प्रश्न पडावा अशी घटना कालपरवा घडली. जवळपास अठरा तास मुंबई ते पुणे दरम्यानची वाहतूक बंद ठेवावी लागली. त्यातच इकडे रायगडमधील मुंबई-गोवा महामार्गही जागोजागी ठप्प झाला होता. या स्थितीत मुंबई व पश्चिम महाराष्ट्राचा संपर्क बंद पडून होता. आता हा रस्ता सुरू झाला असला तरी लोकांच्या मनातली भीती कायम राहील. कालच्या दरड कोसळण्याची दृश्ये ज्यांनी पाहिली असतील त्यांना मिसिंग लिंकमधून जाताना बोगदा डोक्यात पडेल की काय अशी भीती वाटली तर ते गैर म्हणता येणार नाही. फडणवीस सरकारच्या कामाचा हा आहे दर्जा. हे फडणवीस मारे हजारो कोटींचे आकडे फेकून रस्ते आणि उड्डाणपुलांचा विकास दाखवत असतील. पण या रस्त्यांची लायकी अशी असेल तर हे हजारो कोटी रुपये नक्की जातात कुठे आणि याच्या दर्जावर देखरेख ठेवणारे कोणी आहे की नाही असा प्रश्न पडतो.

### म्हणे हा दैवी प्रकोप

चारच दिवसांपूर्वी मिसिंग लिंकवर खड्डे पडल्याचे फोटो प्रसिध्द झाले होते. त्यावेळी कोणत्याही नव्या रस्त्यावर असे होते असे फडणवीस म्हणाले. पहिला पाऊस ही कोणत्याही बांधकामाची चाचणी असते असेही एक नवे ज्ञान त्यांनी लोकांना दिले. त्यानंतर दोनच दिवसात हा दरड कोसळण्याचा प्रकार घडला. ही दरड कोसळणे हाही बहुदा अशाच चाचणीचा भाग असावा. अशा किती चाचण्या या आणि पुढच्या पावसामध्ये घेतल्या जातील आणि त्या होईपर्यंत काय काय नुकसान होईल याची कल्पना करणेही सामान्य लोकांसाठी भयंकर ठरावे. दरड कोसळली तेव्हा काल सुदैवाने या परिसरातून वाहने जात नव्हती. ती जात असती तर किती जीव गेले असते याची कल्पना करण्यासारखी आहे. कालच्या प्रकाराबद्दल मुख्यमंत्री म्हणाले की, हा अभूतपूर्व प्रकार आहे. या डोंगराच्या परिसरात शंभर टन वजनाची दरड किंवा दगड कधीही कोसळलेले नाहीत. एकूण हे सर्व नैसर्गिक किंवा दैवी आपत्तीचा प्रकार असल्याचे भासवण्याचे जोरदार प्रयत्न आहेत. खुद्द फडणवीसांनीच सुरुवात करून दिली म्हटल्यावर पुढच्या काही दिवसात भाजपचे बुद्रुक प्रवक्ते आपापल्या अकलेप्रमाणे त्यात भर घालतीलच. रस्ते विकास महामंडळानेही हा दैवी प्रकोप असल्याने कंत्राटदारावर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही असे सांगून टाकले आहे. हा प्रकल्प नवयुग इंजिनिअरिंग या कंपनीने बांधला आहे. याच कंपनीच्या उत्तराखंडमधील सिल्कियारा प्रकल्पातील बोगदा कोसळून कामगार आत अडकले होते. याच कंपनीने भाजपला शेकडो कोटींच्या निवडणूक देणग्या दिल्या आहेत. याच कंपनीला मुंबईतील अनेक भुयारी मार्गांची कंत्राटे दिली गेली आहेत. त्यामुळे सरकार दरबारी तिचे वजन किती आहे ते दिसतेच. पण याच वजनाने मिसिंग लिंकसारखे प्रकल्प खाली कोसळू लागले आहेत व भविष्यात ते लोकांच्या जिवावर बेतू शकतात.

### सरकारच्या कानाखाली झांजा वाजवा

मुख्यमंत्री म्हणतात की, यापूर्वी या भागात अशा प्रकारे कधीही भूस्खलन झालेले नाही. पण या प्रकल्पांवर आक्षेप घेणाऱ्यांचे हेच तर म्हणणे आहे. आता सुरु झालेले हे अभूतपूर्व भूस्खलन आणि सह्याद्रीच्या डोंगरांची फडणवीस सरकारने चालवलेली बेदरकार कापाकापी यांचा काही संबंध आहे की नाही हाच तर मुख्य प्रश्न आहे. आक्षेप घेणाऱ्यांचा ठाम समज आहे की तो संबंध आहे. त्यासाठी असंख्य प्रकारच्या तांत्रिक चाचण्या प्रामाणिकपणे घेतल्या जाण्याची गरज आहे. कालची दरड कोसळल्यानंतर रस्ते विकास महामंडळाने मुंबई आयआयटीचे नाव पुढे केले आहे. हा प्रकल्प करताना त्यांचा सल्ला घेतला होता असे सांगितले आहे. याबाबत आयआयटीने खुलासा करायला हवा. शिवाय आयआयटीने नेमका काय सल्ला दिला होता हेही जगजाहीर केले जायला हवे. या भागातून दर दिवसाला जाणारी हजारो वाहने, त्यांचा आवाज, धूर, प्रदूषण, त्यांचा पडणारा भार, शिवाय वाट्टेल त्या रीतीने फोडलेले डोंगर यांचा एकत्रित परिणाम कुठेतरी व्यक्त होणारच हे लक्षात घ्यायला हवे. या भागात नेहमीच प्रचंड पाऊस होतो. रेल्वेमार्गावर दरड कोसळण्याचेही अनेक प्रकार पूर्वी झालेले आहेत. अनेक दिवस रेल्वेमार्ग बंद ठेवण्याचीही वेळ आलेली आहे. अशा नाजूक निसर्गामध्ये ढवळाढवळ करताना बरीच काळजी घ्यायला हवी. पण हिमालयासारख्या ठिसूळ पर्वतावरही यांच्या करवती आणि बुलडोझर चालले आहेत तिथे सह्याद्रीची हे काय पत्रास ठेवणार. मिसिंग लिंकचा प्रस्ताव काँग्रेस आघाडीच्या सरकारने गुंडाळून ठेवला. तो आम्ही बाहेर काढून पूर्ण केला अशी शेखी फडणवीस मिरवत असतात. पण आघाडी सरकारच्या काळात या प्रकल्पातील धोक्यांबाबतचे जे इशारे दिले गेले असतील तेही फडणवीस सरकारने आता जाहीर करायला हवेत. रस्ते केली, मेट्रो केली, मुंबई खोदली म्हणजे किती विकास केला असे या सरकारचे सततचे तुणतुणे असते. पण याच विकासामुळे मुंबईत पूर येण्याचे प्रमाण वाढले, नव्याने बांधलेल्या पुलांवर खड्डे पडले, कोस्टल रोडचा बोगदा गळू लागला हे धोक्याचे इशारे आहेत हे ते लक्षात घेत नाही. मुंबईत यंदा झाडे पडण्याची जणू साथ आली असावी. आतापर्यंत किमान ३०० लहानमोठी झाडे पडली असून अनेकांचे बळी गेले आहेत. वाहनांचे नुकसान तर कितीतरीच झाले आहे. मुंबईचे रस्ते काँक्रीटचे होतील असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी महापालिका निवडणुकीपूर्वी दिले होते. ते तर झाले नाहीतच. पण जागोजाग केलेल्या अर्धवट कामांमुळे झाडांना अत्यंत आवश्यक असलेली मुळांभोवतीची माती मात्र नाहीशी झाली आहे. त्याचमुळे झाडांचा आधार नष्ट होत असून ती पडत आहेत. तरीही फडणवीस सरकार किती विकास केला याचाच डफ वाजवणार असेल तर मतदारांनीही त्या सरकारच्या कानाखाली झांजा वाजवायला हव्यात.

**विचार**

# जलसंवर्धनासाठी एआय!

*आज देशात केवळ जलसंधारण पुरेसे नाही, तर उपलब्ध पाण्याचा अत्यंत कार्यक्षम वापर करणे आवश्यक झाले आहे. येथेच कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेटशी जोडलेली उपकरणे, सूक्ष्म संगणकीय चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. अशा प्रकारच्या यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञान पारापर्यंत आणत असून जलसंवर्धनाच्या कामी महत्वाची भूमिका बजावू शकतात. त्यांचा अभ्यास आणि रास्त वापर महत्वाचा आहे.*



डॉ. दीपक शिकारपूर

भारतात या वर्षी कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हवामानबदल, वाढते तापमान, भूजलाची घटती पातळी आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाण्याचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध जलस्रोत मात्र मर्यादित होत आहेत. अशा परिस्थितीत केवळ जलसंधारण पुरेसे नाही, तर उपलब्ध पाण्याचा अत्यंत कार्यक्षम वापर करणे आवश्यक झाले आहे. येथेच कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेटशी जोडलेली उपकरणे, सूक्ष्म संगणकीय चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आज आपण ज्या पद्धतीने पाणी वापरतो, त्यात मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. अनेक शेतकरी मोटार सुरू करून बंद करायला विसरून जातात. टाक्या भरल्यानंतरही पाणी वाहत राहते. गळतीमुळे हजारो लिटर पाणी वाया जाते. अनेक ठिकाणी पाण्याचे वितरण नियोजनशून्य असते. या सर्व समस्यांवर डिजिटल तंत्रज्ञान प्रभावी उपाय देऊ शकते. शेती हे भारतातील सर्वाधिक पाणी वापरणारे क्षेत्र आहे. अनेकदा पिकांना आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी दिले जाते. यामुळे पाण्याचा अपव्यय होतोच, शिवाय जमिनीची गुणवत्तादेखील कमी होते. आधुनिक मृदा आर्द्रता मापक संवेदक जमिनीतील ओलावा सतत मोजतात. हे संवेदक सूक्ष्म चिप्सद्वारे माहिती संकलित करून संगणक किंवा भ्रमणध्वनीवर पाठवतात. कृत्रिम बुद्धिमत्ता या माहितीचे विश्लेषण करून पिकाला नेमके किती पाणी आवश्यक आहे हे ठरवते. त्यामुळे आवश्यक तेवढेच सिंचन होते आणि पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. अशा प्रकारच्या यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञान पारापर्यंत आणत असून जलसंवर्धनाच्या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

स्वयंचलित पंप नियंत्रण ही आणखी एक क्रांतिकारी संकल्पना आहे. पाण्याच्या टाकीत किंवा विहिरीत बसवलेले संवेदक पाण्याची पातळी सतत मोजतात. टाकी रिकामी झाल्यास पंप आपोआप सुरू होतो आणि टाकी भरल्यावर बंद होतो. त्यामुळे पाणी ओसंडून वाहण्याची समस्या संपते. शेतकरी किंवा शेतीचे काम पाहणारा सहाय्यक दूर असतानाही संपूर्ण व्यवस्था कार्यरत राहते. मोबाईल फोनवर संदेश किंवा सूचना पाठवून प्रणाली आवश्यक माहिती देते. त्यामुळे वीज आणि पाणी या दोन्हींची बचत होते. ग्रामीण भागात अनेक वेळा पाणीपुरवठा योजनांमध्ये गळतीची समस्या आढळते. पारंपरिक पद्धतीने गळती शोधण्यासाठी मोठा खर्च आणि वेळ लागतो. परंतु आधुनिक संवेदक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली पाइपलाइनमधील दाबातील बदलांचे विश्लेषण करून गळतीचे अचूक ठिकाण शोधू शकतात. यामुळे लाखो लिटर पाण्याची बचत होते. जगातील अनेक शहरांमध्ये अशा स्मार्ट जलव्यवस्थापन प्रणाली यशस्वीपणे वापरल्या जात आहेत. पर्जन्यमानाचा अचूक अंदाज घेण्यासाठी देखील आज कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरत आहे. उपग्रह चित्रे, हवामान केंद्रांची माहिती, तापमान, आर्द्रता आणि वाऱ्याचा वेग यांचे विश्लेषण करून पावसाचा अधिक अचूक अंदाज दिला जाऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाचे नियोजन करणे सोपे जाते. अनावश्यक पाणी देणे टाळले जाते आणि पिकांचे संरक्षणही होते.

शहरे आणि महानगरांमध्ये स्मार्ट जलमीटर मोलाची भूमिका बजावू शकतात. हे मीटर प्रत्येक घरातील पाणीवापराचे अचूक मोजमाप करतात. अचानक वापर वाढल्यास किंवा गळती आढळल्यास तत्काळ सूचना मिळते. नागरिकांना त्यांच्या वापराचे विश्लेषण पाहता येते आणि बचतीसाठी उपाय करता येतात. भविष्यात प्रत्येक घरात असे स्मार्ट जलमीटर बसवले गेल्यास शहरी भागातील पाण्याचा अपव्यय लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सहाय्यक गावागावांमध्ये जलजागृतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. स्थानिक भाषेत माहिती देणारी प्रणाली नागरिकांना पाणीबचतीच्या सवयी शिकवू शकते. किती पाणी वापरले, किती बचत झाली, कोणते उपाय प्रभावी आहेत याबाबत मार्गदर्शन करता येते. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना जलसंवर्धनाचे प्रशिक्षण देण्यासाठी संवादात्मक तंत्रज्ञान वापरता येईल. धरणे, तलाव आणि जलाशयांच्या व्यवस्थापनातदेखील डिजिटल तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त भूमिका बजावू शकते. विविध ठिकाणी बसवलेले संवेदक पाण्याची पातळी, गुणवत्ता आणि साठ्याची माहिती सतत गोळा करतात. कृत्रिम बुद्धिमत्ता या माहितीचे विश्लेषण करून भविष्यातील पाणी उपलब्धतेचा अंदाज देते. त्यामुळे जलसंपत्तीचे नियोजन अधिक वैज्ञानिक पद्धतीने करता येते. भूजल पातळीचा अभ्यास करण्यासाठीही आधुनिक चिप्स आणि संवेदक वापरले जाऊ शकतात. विविध विहिरींमधील पाण्याची पातळी मोजून कृत्रिम बुद्धिमत्ता भूजलाचा नकाशा तयार करू शकते. त्यामुळे कोणत्या भागात पाण्याचा अतिवापर होत आहे आणि कुठे पुनर्भरणाची आवश्यकता आहे हे प्रशासनाला समजू शकते. परिणामी दीर्घकालीन जलधोरण तयार करणे सोपे होते.

पाणी गुणवत्तेचे परीक्षणदेखील अत्यंत महत्त्वाचे काम आहे. अनेक गावांमध्ये दूषित पाण्यामुळे आरोग्य समस्या निर्माण होतात. अशा वेळी तांत्रिक करामतीतून उभे राहणारे आधुनिक संवेदक पाण्यातील अशुद्धता, रासायनिक घटक आणि प्रदूषणाचे प्रमाण तपासू शकतात. पाण्याची गुणवत्ता खराब झाल्यास त्वरित सूचना मिळते. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे सुरक्षित पाणी उपलब्ध करून देता येते. भारतातील स्टार्टअप उद्योग आणि तरुण अभियंत्यांसाठी हे क्षेत्र मोठी संधी निर्माण करत आहे. कमी खर्चातील संवेदक, स्वदेशी चिप्स, स्मार्ट सिंचन प्रणाली, जलविश्लेषण सॉफ्टवेअर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाय विकसित करून जागतिक बाजारपेठेत प्रवेश करता येऊ शकतो. ग्रामीण भारतासाठी परवडणारे आणि स्थानिक गरजांनुसार तयार केलेले उपाय या कामी विशेषतः महत्त्वाचे ठरणार आहेत. असे असले तरी यासंदर्भात तंत्रज्ञान हे प्रश्नांवरील एकमेव उत्तर नाही. नागरिकांमध्ये पाणीबचतीची जाणीव निर्माण करणे तेवढेच आवश्यक आहे. गळणारे नळ दुरुस्त करणे, पावसाचे पाणी साठवणे, पुनर्वापर वाढवणे, वाहन धुण्यासाठी कमी पाणी वापरणे आणि शेतीत सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करणे या सवयी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान आणि जबाबदार नागरिकत्व यांचा संगम झाल्यासच खरे जलसंवर्धन साध्य होईल. हल्ली पावसाचे भाकीत वर्तवणे विशेष कौशल्याचे काम बनत आहे. त्यातल्या त्यात काही वेळात अचानक मोठा पाऊस पडून जात असल्यामुळे आणि नंतर तो अचानक गायब होत असल्याने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन आवश्यक बनत आहे. आजघडीला तर या वर्षी पाऊस काहीसा रुसलेला राहील, असेही आवर्जून सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच धोरणकर्त्यांच्या मनात आधीच शंकेची पाल चुकचुकत आहे. कमी पावसाच्या शक्यतेमुळे येणारी वर्षे आव्हानात्मक ठरू शकतात. परंतु योग्य नियोजन, डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ यामुळे प्रत्येक थेंबाचे व्यवस्थापन शक्य आहे. भविष्यातील भारताला पाणीसुरक्षित बनवायचे असेल तर जलसंधारणाबरोबरच स्मार्ट जलव्यवस्थापन स्वीकारावे लागेल. प्रत्येक थेंब मोलाचा आहे आणि त्या प्रत्येक थेंबाचे संरक्षण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, संवेदक, चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान ही आजची नव्हे तर उद्याची अपरिहार्य गरज बनली आहे.

**चर्चा आजची**

# मुलांभोवती घोंघावतेय सायबरचे वावटळ



वैभव पाटील

महावितरणकडून वीज वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी राज्यभर स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात हे स्मार्ट मीटर ग्राहकांसाठी फायदेशीर ठरत आहेत, की आर्थिक फटका देत आहेत, असा प्रश्न आता राज्यभरातील अनेक वीज ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यात जुने वीज मीटर खराब झाल्यानंतर त्यांच्या जागी नवीन स्मार्ट मीटर बसविण्याचे काम महावितरण आणि अदानी एनर्जी - सोल्युशन्सच्या माध्यमातून करण्यात आले. काही ठिकाणी ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर बसविण्यात आल्याच्या तक्रारी समोर येत असून, विरोध करणाऱ्या काही ग्राहकांशी कर्मचाऱ्यांनी अरेरावी केल्याची चर्चा देखील सुरू आहे. मागील काही दिवसांपासून वीज वितरण कार्यालयाच्या ठेकेदारांकडून ग्राहकांना कोणतीही कल्पना न देता परस्पर मीटर बदलले जात आहेत. नवीन मीटरचा भार हा अधिक असून, दोन ते तीन पट वीजबिल येत आहेत. त्यामुळे वीज वितरण कार्यालयाची मनमानी सहन केली जाणार नाही, असे वीज ग्राहकांमधून सांगण्यात येत आहे.

सध्या महावितरणकडून स्मार्ट मीटरचे गोडवे गायले जात आहेत. परंतु, नागरिकांमध्ये मात्र, स्मार्ट मीटरबाबत असंतोष आणि संशयाचे वातावरण आहे. तांत्रिक प्रगतीला कोणाचा विरोध नाही, पण ज्या पद्धतीने ही योजना रेटली जात आहे, त्यावरून मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आधीच वाढीव वीजबिले आणि भारनियमनाने नागरिक त्रस्त आहेत. अशातच स्मार्ट नाव देऊन ग्राहकांच्या खिशाला कात्री लावणारी यंत्रणा लादली जात असल्याचा संशय बळावला आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे वीज वापराचे अधिक अचूक मोजमाप होईल आणि ग्राहकांना त्याचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा वीज ग्राहकांकडून व्यक्त केली जात होती. परंतु, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर अनेक ग्राहकांना पूर्वीपेक्षाजास्त वीज बिले येत असल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे, काही ग्राहकांची घरे बहुतांश काळ बंद असतात किंवा त्यांचा वीज वापर अत्यंत मर्यादित असतो. असे असतानाही जुन्या मीटरच्या तुलनेत स्मार्ट मीटरनुसार आकारण्यात येणारे वीज बिल अधिक येत असल्याचा दावा ग्राहकांकडून केला जात आहे. त्यामुळे घर बंद असताना किंवा वापर नगण्य असताना वाढीव वीज बिल कसे येते, याबाबत ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात महावितरणकडे विचारणा केल्यास मीटर तपासण्याचा सल्ला दिला जात असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर खरोखरच अचूक आहेत का? घरात वापर नसताना युनिट्सची नोंद कशी वाढते? ग्राहकांना येणारी वाढीव बिले कोणत्या निकषांवर आकारली जात आहेत? असे अनेक प्रश्न सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या मनात निर्माण झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर महावितरणने स्मार्ट मीटर प्रणालीची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी. तसेच, वाढीव बिलांच्या तक्रारी असलेल्या मीटरची शासनस्तरावरून प्रयोगशाळांच्या माध्यमातून तपासणी करून रिडिंगमधील तफावतीचे नेमके कारण स्पष्ट करावे, अशी अपेक्षा ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे. स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीमुळे ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची भावना वाढत असेल, तर त्याची गंभीर दखल घेणे ही महावितरणची प्रमुख जबाबदारी आहे. केंद्र सरकारच्या वीज नियमांचा चुकीचा अर्थ लावून, ग्राहकांना दुसरा पर्यायच नाही, अशी भीती दाखवली जात आहे.

आज महाराष्ट्रातील गोरगरिबांना व मध्यमवर्गीयांना प्रश्न पडला आहे की, या अब्जावधी रुपयांच्या प्रकल्पाचा खरा लाभार्थी कोण? वर्षानुवर्षे घाम गाळून वीजबिल भरणारी सामान्य जनता की या प्रकल्पात कोट्यवधींची कंत्राटे लाटणाऱ्या अदानीसारख्या बड्या खासगी कंपन्या? जर हा प्रकल्प इतकाच पारदर्शक आणि जनतेच्या हिताचा आहे, तर मग सरकार आणि महावितरण जनतेला विश्वासात घेण्यास का घाबरत आहे? तसेच, ज्या ज्या भागात हे स्मार्ट मीटर प्रायोगिक तत्त्वावर बसवले गेले, तिथून येणाऱ्या तक्रारी मन हेलावून टाकणाऱ्या आहेत. अचानक आलेली वाढीव वीजबिले, तांत्रिक बिघाड, चुकीचे रीडिंग आणि अतिरिक्त वीजभाराच्या नावाखाली लाखो रुपयांचे आकारले जाणारे दंड यामुळे सामान्य नागरिक अक्षरशः त्रस्त झाला आहे. महावितरणच्या स्वतःच्या जुन्या चुका, गळती आणि निष्काळजीपणाचे पाप आता 'स्मार्ट' मीटरच्या नावाखाली सामान्य जनतेच्या खिशातून वसूल केले जात असून, हा घोर अन्याय असल्याचे वीज ग्राहकांमधून बोलले जात आहे.

दरम्यान, या स्मार्ट मीटरच्या माध्यमातून भविष्यात गरिबांच्या घरात प्रीपेड वीज व्यवस्था लागू करण्याचा डाव तर नाही ना? ही भीती आज प्रत्येक नागरिकाला सतावत आहे. आधीच महागाईने होरपळलेल्या जनतेची वीज एका 'क्लिक'वर बंद करण्याची क्रूर यंत्रणा उभारण्यामागे सरकारचा नेमका हेतू काय? तसेच, ग्राहकांच्या वापराच्या गोपनीय माहितीची सुरक्षा कोण करणार? असे एक ना अनेक प्रश्न विज ग्राहकांमधून उपस्थित होत आहेत.

**लोकसंसद**

### अग्निविरांना मिळणारं कायम स्वरुपी नोकरी ?

भारत सरकारने युवकांना रोजगार आणि भारत मातेच्या रक्षणासाठी आवड असणाऱ्या तरुणांना अग्निपथ योजनेंतर्गत अग्निविरच्या माध्यमातुन अनेक जवानांना चार वर्षांची सेवा अर्थात नोकरी करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे मात्र चार वर्षांनंतर पुढे काय करायचे असा प्रश्न अग्निविरांना सतावत होता मात्र यावर इलाज म्हणून जे हवाई, लष्कर आणि नौदलात नेव्ही म्हणून सेवा बजावत आहेत अशा अग्निविरांना एक आनंदाची बातमी आली आहे एका वृत्तानुसार नौदल आणि हवाई दलाने अग्निविरांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी कोटा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला सादर केल्याचे वृत्त आहे चार वर्षांनंतर २५ टक्के अग्निविरांना सद्या कायमस्वरुपी नोकरी दिली जाते मात्र या धोरणात लवकरचं बद्दल होतील असे बोलले जात आहे त्यामुळे अग्निविरांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत हवाई आणि नौदलाने हा कोटा वाढविण्याचे सुचवले आहे. अग्निविरांच्या पहिल्या तुकडीचा कार्यकाळ या वर्षाच्या अखेरीस संपणार आहे त्यामुळे त्यांना सेवेतून मुक्त केले जाईल आणि ज्यांना स्वेच्छेने सशस्त्र दलात सेवा सुरु ठेवायची आहे त्यांना पुन्हा गुणवत्तेच्या जोरावर संधी दिली जाणारं आहे चार वर्षांच्या काळात अग्निविरांनी शस्त्रे आणि शत्रूशी सामना करण्याचा अनुभव घेतला आहे आशा कर्मचाऱ्यांना कायम ठेवल्यास भारतीय सशस्त्र दलांना लाभ होईल असे सशस्त्र दलांचे मत आहे त्यामुळे आगामी काळात अग्निविरांना कायमस्वरुपी भारत मातेच्या रक्षणासाठी जबाबदारी मिळते का ? ते पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे.

**- राजू जाधव, मांगूर**

**दिनविशेष**

# प्रसिद्ध कवी बा. भ. बोरकर

बाळकृष्ण भगवंत बोरकर हे मराठीतील प्रसिद्ध कवी, कादंबरीकार आणि लघुनिबंधकार होते. बोरकर यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९१० रोजी कुडचडे (गोवा) येथे झाला. त्यांचे शिक्षण धारवाड येथे मराठी तीन इयत्ता व इंग्रजी मॅट्रिकपर्यंत झाले (१९२८). पोर्तुगीज टीचर्स ट्रेनिंग कॉलेजची प्रमाणपत्र परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. गोव्यातील खासगी व सरकारी हायस्कूलांमध्ये ते शिक्षक होते. काही काळ मुंबईच्या विविध वृत्तपत्रात त्यांनी नोकरी केली. १९४६ मध्ये गोव्याच्या स्वातंत्र्य-आंदोलनात त्यांनी भाग घेतला. आमचा गोमंतक (१९४८) व पोर्जेचो आवाज (कोकणी, १९५५) या पत्रांचे ते संपादक होते. आकाशवाणीच्या पुणे-पणजी केंद्रांवर, वाङ्मय विभागात,



१९५५ ते १९७० पर्यंत काम करून ते निवृत्त झाले.

प्रतिभा हा बोरकरांचा पहिला काव्यसंग्रह मडगाव येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनात प्रसिद्ध झाला (१९३०). त्यानंतर जीवन संगीत (१९३७), दूधसागर (१९४७), आनंद भैरवी (१९५०), चित्रवीणा (१९६०), गीतार (१९६६), चैत्रपुनव (१९७०) आणि कांचनसंध्या (१९८१) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. सासाय हा त्यांचा कोकणी काव्यसंग्रह १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याला त्या वर्षीचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. १९८१ मध्येच कालिदासकृत मेघदूताचा त्यांनी केलेला समवृत्त, समश्लोकी मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला. बोरकरांचे व्यक्तिमत्त्व व कवित्व संस्कारबहुल आहे.

तसे ते परंपराप्रेमी पण त्यांच्या परंपराप्रेमावर झालेल्या सुभग व रसपूर्ण संस्कारांनी त्यांना 'कवी' बनविले. ग्रीकांच्या सौंदर्यदृष्टीचे मर्म पाश्चात्य साहित्याच्या अध्ययनाने आणि पौर्वात्य आत्मदर्शनाचे स्वरूप मराठी संतांच्या अभ्यासातून त्यांनी आत्मसात केले. बालकवी आणि विशेषतः तांबे यांच्या कवितेचा आदर्श त्यांच्यापुढे होता. निसर्गसौंदर्य व स्त्रीलावण्य यांच्यामधून बोरकरांना जीवनचैतन्याचा साक्षात्कार झाला. निसर्ग व प्रणय यांची त्यांच्या कवितेतील अनुभूती सर्जनशील व ऐंद्रिय होती.

बोरकरांच्या कथा प्रियदर्शिनी (१९६०) आणि समुद्रकाठची रात्र (१९८१) ह्या संग्रहांत समाविष्ट झालेल्या आहेत. मावळता चंद्र (१९३८), अंधारातील वाट (१९४३) व भावीण (१९५०) ह्या त्यांच्या तीन कादंबऱ्या होत. यापैकी भावीण विशेष गाजली. तिची पाच भाषांत भाषांतरेही झाली आहेत. कागदी होड्या (१९३८) या त्यांच्या लघुनिबंधसंग्रहात काव्य व चिंतन यांचा मधुर मिलाफ आढळतो. चांदण्यांचे कवडसे हा त्यांचा ललितनिबंधसंग्रह १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला. आनंदयात्री रवींद्रनाथ (१९६३) हे टागोरांचे चरित्रही त्यांनी मोठ्या समरसतेने लिहिले.

बोरकरांना कवितेबद्दल महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे सुवर्णपदक (१९३४), भावीण कादंबरीबद्दल गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे सुवर्णपदक (१९५०), आनंद भैरवी, चित्रवीणा, गीतार, आनंदयात्री रवींद्रनाथ या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके, असे सन्मान लाभले. राष्ट्रपतींनी ङ्गपद्मश्रीफ हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला (१९६७). स्वातंत्र्यसंग्रामात बोरकर ह्यांनी केलेल्या कार्याबद्दल भारत सरकारतर्फे त्यांना ताम्रपट देण्यात आला (१९७४). अशा या प्रसिद्ध कवीचे ८ जुलै १९८४ रोजी निधन झाले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ जुलै

१) श्री. ज्योतिप्रकाश गणपतराव मुकादम, इस्त्रायल आळी, अलिबाग, दि.८-७-१९४४

२)श्री.प्रकाश भगवान डबरी कोळीवाडा, अलिबाग दि.८-७-१९५४

३)श्री.शरयू दामोदर मगर मु.वेश्वी, अलिबाग दि.८-७-१९५०

४)श्रीम.चारूशीला चंद्रकांत गुरव मु.रामनाथ, अलिबाग दि.८-७-१९६२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

# श्रीवर्धनमध्ये दिवसाही पथदिवे सुरूच

## ● नगरपरिषदेवर अतिरिक्त वीजबिलाचा बोजा ● प्रशासनाकडून दखल घेणे गरजेचे

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरामध्ये सीएसआर फंडामधून नवीन पथदिवे बसविण्यात आले. अगोदर हे पथदिवे सौर उर्जे वर चालणार असल्याबाबत माहिती मिळाली होती. परंतु, पथदिव्यांचे लोकार्पण झाल्यानंतर अद्यापपर्यंत तरी हे दिवे कोणत्याही प्रकारच्या सौर उर्जेवर सुरू झालेले नाहीत. ते महावितरणच्या विजेवरतीच सुरू आहेत.

हे पथदिवे सुरू होण्यासाठी व बंद होण्यासाठी टायमर पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. परंतु, अनेकवेळा दिवस उजाडून गेल्यानंतर देखील पथदिवे सुरू असल्याचे पाहायला मिळत होते. तर सायंकाळी अंधार झाल्यानंतर देखील हे पथदिवे पेटत नव्हते. याबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर नगरपरिषदेने हे टाइमिंग



बदलून घेतले. परंतु, मागील काही दिवसापासून हे पथदिवे दिवसादेखील अनेक वेळा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

### गाव खात्याचा कारभार सुरू?

शहरात अनधिकृत बांधकामाचे व अतिक्रमणांचे प्रमाण देखील खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. श्रीवर्धन बाजारपेठेत अनेक व्यापाऱ्यांनी गटारावरती आपली दुकाने सुरू केली असून, शटर देखील नगर परिषदेत रस्त्याच्या हद्दीत बसवण्यात आलेली आहेत. एकूणच नगरपरिषदेत गाव खात्याचा कारभार सुरू आहे का? अशा प्रकारची चर्चा नागरिकांमधून होताना दिसत आहे. तरी नगरपरिषद प्रशासनाने पथदिवे दिवसा सुरू राहणे, त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यावरती तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांची पदोन्नतीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत उपायुक्तपदी बदली झाल्यानंतर श्रीवर्धन नगर परिषदेच्या प्रशासनाचा कारभार वाऱ्यावरच असल्याचे दिसत आहे. या नवीन बसविलेल्या पथदिव्यांमुळे नगरपरिषदेला वीज बिल देखील मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यातच हे पथदिवे दिवसा सुरू राहिल्यामुळे नगरपरिषदेवर अतिरिक्त वीज बिलाचा बोजा पडत असल्याचे दिसून येत आहे. अनेकवेळा महावितरणचे वीज बिल थकल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत. श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाकडून अनेक नागरी सुविधांबाबत योग्य प्रकारे दखल घेतली जात नसल्याबद्दल नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

# कोसळलेली दरड हटवून वाहतूक केली सुरळीत



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

सततच्या मुसळधार पावसामुळे सोमवारी रात्री उरण तालुक्यातील चिरनेर अक्कादेवी आदिवासींच्या वाडीला जोडणाऱ्या रस्त्यावर मोठी दरड कोसळण्याची घटना घडली. दरड रस्त्यावर आल्यामुळे मोठ्या प्रमाणात मुरूम, माती, दगड रस्त्यावर आले होते. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीबरोबर या भागातील शेतकरी व आदिवासींची वाट बंद झाली होती. घटनेची माहिती चिरनेर ग्रामपंचायत प्रशासनाला मिळताच, प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचून जेबीसीने रस्त्यावरील मुरूम, माती व डोंगराचा मलबा काढून वाहतूक पुन्हा सुरळीत केली.

# प्रवाशांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांना आजही मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचे चित्र आहे. स्थानकावर उभारण्यात आलेले पादचारी पूल (फूटओव्हर ब्रिज) आणि त्यावरील पायऱ्यांवर अद्यापही पूर्णपणे शेड नसल्याने मुसळधार पावसात प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

सतत कोसळणाऱ्या पावसात छत्री उघडून पायऱ्या चढत-उतरत रेल्वे गाडी पकडताना प्रवाशांची अक्षरशः दमछाक होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुलांसह प्रवास करणारे पालक आणि दिव्यांग



प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ओल्या पायऱ्यांमुळे घसरून अपघात होण्याची भीतीही कायम आहे.

उन्हाळ्यात कडक उन्हाचा सामना करत गाडीची वाट पाहणारे प्रवासी आता पावसाळ्यातही पावसाच्या तडाख्यातूनच प्रवास करण्यास मजबूर आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून स्थानकाचा विकास करण्यात आला असला, तरी प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या शेडसारख्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

पनवेल येथे दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असते. त्यामुळे फूटओव्हर ब्रिज व पायऱ्यांवर तातडीने शेड उभावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# महागडे बियाणे शेतात कुजले

## ● शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

जून महिन्याच्या सुरुवातीला अपेक्षित असणारा पाऊस जूनच्या अखेरीस उशिरा सुरू झाला. या पावसात भात पेरणी केलेल्या शेतकऱ्यांनी चांगल्या हंगामाची स्वप्न पाहिली होती. मात्र त्यानंतर सलग कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे भात बियाणे शेतातच कुजून गेले. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे मोठे संकट ओढावले आहे.

यंदा पावसाने सुरुवातीलाच दडी मारल्याने पेरण्या उशिरा झाल्या. त्यानंतर काही दिवसांच्या विश्रांतीनंतर अचानक झालेल्या धुवाधार पावसामुळे भात खाचरामध्ये पाणी साचून राहिले. चार ते पाच दिवस पाणी न ओसरल्याने भाताचे राब अक्षरशः



कुजून गेले. महागडी बियाणे विकत घेऊन पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना आता पुन्हा बियाणांचा शोध घ्यावा लागत आहे. बाजारातही बियाणे उपलब्ध नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरण तालुक्यातील औद्योगिकरणामुळे शेतीचे क्षेत्र आधीच कमी झाले आहे. त्यातच यंदाच्या अवकाळी पावसाने उरली सुरली अशाही हिरावून घेतली आहे. महागडे बियाणे, वाढलेले मजुरीचे दर आणि पेरणीचे झालेले नुकसान यामुळे अनेक शेतकरी यंदा काही क्षेत्र पडीक ठेवण्याच्या विचारात आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत दुबार पेरणीसाठी मोफत अथवा अनुदानित बियाणे व सरसकट पंचनामे करून, भरपाई देण्याची मागणी येथील शेतकऱ्यांकडून होत आहे.

> **अति पावसामुळे भातखाचरामध्ये पाणी साचल्याने भात रोपांची उगवणच झाली नाही. काही ठिकाणी उगवलेली रोपेही दहा टक्केच उगवली असून, अत्यंत विरळ व कमकुवत आहेत.**
>
> **– प्रफुल्ल खारपाटील, कृषीमित्र**

# ‘बॉटल बँक’ उपक्रमाचा शुभारंभ

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पर्यावरण संवर्धन आणि प्लास्टिकमुक्त परिसराचा संदेश देण्यासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात प्लास्टिकच्या रिकाम्या पाण्याच्या बाटल्यांचे संकलन करण्यासाठी विशेष बॉटल बँक उभारण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पोलीस अधिकारी आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या बॉटल बँकमध्ये नागरिकांनी वापरलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या टाकाव्यात, त्या कचऱ्यात किंवा परिसरात फेकू नयेत, असा संदेश देण्यात येत आहे. ‘मला खाऊ घाला, पृथ्वीला नाही’ असा पर्यावरणपूरक संदेश या बॉटल बँकेवर देण्यात आला असून,




प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. या उपक्रमामुळे पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ राहण्यास मदत होणार असून, नागरिकांमध्ये प्लास्टिकमुक्ती आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृतीही होणार आहे. पर्यावरणपूरक उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत असून, इतर शासकीय कार्यालयांनीही अशा उपक्रमांचा आदर्श घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रानभाज्यांच्या विक्रीतून उदरनिर्वाह

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

पावसाळा सुरू होताच परिसरातील जंगलांमध्ये विविध प्रकारच्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. या रानभाज्या गोळा करून आदिवासी महिला मुरूड शहरातील मुख्य बाजारात विक्री करत असून त्यातून त्यांना उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन मिळत आहे.

टाकळा, अळूची पाने, भारंगी, बीरडा यांसारख्या पौष्टिक रानभाज्यांना ग्राहकांकडून चांगली मागणी आहे. सकाळी जंगलातून रानभाज्या गोळा करून आदिवासी महिला शहरातील लक्ष्मीखार, मच्छी मार्केट, विविध ठिकाणी


(गणेश चोडणेकर)

डोक्यावर टोपली घेऊन गल्ली गल्लीतून विक्रीसाठी आणतात. या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे घरखर्चाला हातभार लागतो. पावसाळ्याच्या काळात रानभाज्यांचा हा व्यवसाय अनेक आदिवासी कुटुंबांसाठी आर्थिक आधार ठरत आहे.

# गौरव पोतदारांचा पर्यावरणपूरक उपक्रम

**तळा :** गौरव पोतदार व सहकारी मित्र राजेश करडे यांनी म्हसळा बायपास रस्त्यालगत वृक्षारोपण पर्यावरणपूरक अनोखा उपक्रम राबविला. त्यांनी सामाजिक बांधिलकीतून २५ झाडे लावली. या झाडांच्या संवर्धनाबरोबर संगोपन करण्याचा संकल्पही त्यांनी केला आहे. या अनोख्या वृक्षारोपण उपक्रमांनी त्यांनी समाजापुढे आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या उपक्रमाचा युवापिढीने आदर्श घेऊन सामाजिक कार्याला वाहून घ्यावा, असा संदेश दिला आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नागरिकांना झाडे वाटप करून जनजागृती

## ● शिव प्रतिष्ठान करंजाडेचा स्तुत्य उपक्रम

**| उरण | प्रतिनिधी |**

शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या माध्यमातून नेहमी समाजात विविध विषयावर जनजागृती केली जाते. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, सजीव सृष्टीचे धोक्यात असलेले अस्तित्व लक्षात घेता पर्यावरणाचे, निसर्गाचे संरक्षण संवर्धन होण्याच्या दृष्टी कोणातून शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या पदाधिकारी सदस्यांनी विविध उपक्रम राबविण्यास सुरवात केली आहे.

शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने ‘एक झाड करंजाडेच्या मातीसाठी, एक झाड ऑक्सिजनयुक्त करंजाडेसाठी’ ही संकल्पना मोठ्या उत्साहात पार



पडली. यावेळी करंजाडे येथे वड, पिंपळ, लिंब यासारखी अनेक ऑक्सिजनयुक्त झाडे लावून तसेच मोफत लोकांना झाडे वाटप कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी करंजाडेमधील लोकांना शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या वतीने आवाहन करण्यात आले की, कोणावर अवलंबून न राहता आपली कामे आपणच केली पाहिजे, तरच आपला गाव शहर हा संघटित होऊ शकतो. प्रत्येकाने झाडे लावा, वृक्ष लावा जेणेकरून पर्यावरणाचे, निसर्गाचे संवर्धन, संरक्षण होईल.

**आजही पुलावरून होते दिमाखात रहदारी | वाहतुकीचा प्रश्न कायमचा मिटला**

# पालदाड पूल ठरतोय आशेचा किरण

**| रोहा/धाटाव | प्रतिनिधी |**

गेल्या दिवसांपासून मुसळधार पावसाच्या तडाख्याने रोह्यातून अष्टमी परिसरात जाण्यासाठी रहदारीचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मात्र तरीही रोह्यातील पालदाड पूल आज खऱ्या अर्थाने परिसरातील नागरिकांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

हा पूल झाल्यामुळे अनेक गावांमधील वाहतुकीचा आणि दळणवळणाचा प्रश्न कायमचा मिटला असून, स्थानिक रहिवाशांच्या सुकर प्रवासाचा मार्ग मोकळा झाल्याचा आज आनंद होताना दिसत आहे. मात्र कुंडलिका नदीपलीकडील १४ गावातील नागरिकांच्या संघर्षातून



दिमाखात उभ्या असलेल्या पुलावरून दिमाखात रहदारी करताना या गावांतील नागरिक मात्र दिवंगत पत्रकार लक्ष्मण ठाकूर आणि त्यांच्या सहकारी वर्गाच्या स्मृतींना आजही उजाळा देताना दिसत आहेत.

कुंडलिका नदीपलकडील गावातील रहिवासी, नागरिकांना जाण्यासाठी दगडी पुलानंतर उंच असा पर्यायी मार्ग म्हणजे अष्टमी पुलावरून पुढे वळसा घेत आपापल्या गावी पायपीट करीत लांब पल्ल्याचा प्रवास करून जावे लागत असे. पिंगळसईपासून खांब परिसरात येणाऱ्या या गावांना नदीपलीकडे जाण्यासाठी पर्यायी मार्गासाठी उडदवणे गावातील तत्कालीन दिवंगत पत्रकार लक्ष्मण ठाकूर यांच्या संकल्पनेतून १४ गावांसाठी कुंडलिका नदीवर पूल व्हावा ही संकल्पना पुढे आली.

यामध्ये ठाकूर यांच्यासमवेत अंबाजी कोलाडकर, पुतळाजी कोलाडकर, विठ्ठल ठाकूर, धनाजी लोखंडे, खेळू ढमाल यांसह बुजुर्ग मंडळींनी त्यांच्या तत्कालीन सहकारी वर्गाने अनेक निवेदने देऊन तीव्र संघर्ष, जनआंदोलन, रस्ता रोको, धरणे आंदोलन, उपोषण, एकजूट असा मोठा लढा उभारला होता.

आम्हा नागरिकांसाठी तो पूल वर्षानुवर्ष येणाऱ्या पुराच्या पाण्यातून मार्गक्रमण करताना आता तोच आशेचा किरण आहे, असे या परिसरातील नागरिक आनंदाने सांगत आहेत.

### वेळ आणि इंधन दोन्हींची बचत

पालदाड पूल केवळ दोन किनाऱ्यांना जोडणारा सिमेंटचा साचा नसून, तो या भागातील विकासाची जीवनवाहिनी ठरत आहे. या पुलामुळे रखडलेला प्रवास आता अवघ्या काही मिनिटांवर आला असून, नागरिकांचा वेळ आणि इंधन दोन्ही वाचत आहे. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचवणे आता या पुलामुळे शक्य झाले आहे. शेतकरी आणि छोट्या व्यापाऱ्यांना आपला माल बाजारपेठेपर्यंत जलद गतीने वाहून नेण्यासाठी हा पूल मोठा आधार बनला आहे.

## निवडक



### रानसई धरण अखेर ओव्हर फ्लो

**उरण :** उरण तालुक्यातील दोन लाख नागरिकांना पाणीपुरवठा करणारे रानसई धरण रविवारी (दि.५) रात्री एकच्या सुमारास ओव्हर फ्लो होऊन वाहू लागले आहे. मागील पाच दिवसांपासून कोसळणारे आणि डोंगर माथ्यावरून येऊन थेट धरणात मिळणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे धरण दुथडी भरून वाहु लागले आहे. मागील वर्षीही १८ जुलै रोजीच धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याची माहिती उरण एमआयडीसीच्या कार्यालयातुन देण्यात आली. मात्र यावर्षी अवघ्या पाच दिवस कोसळणाऱ्या पावसात रानसई धरण ओसंडून वाहत असल्याने उरणकरांची पाण्याची चिंता मिटली आहे. उरण तालुक्यातील रानसई धरणाची उंची १६६ फूट असून ८६ फूट ही मूतसाठ्याची पातली आहे. या धरणातून तालुक्यातील २५ गावे, उरण शहर आणि काही औद्योगिक विभागासह सुमारे दोन लाख लोकसंख्येच्या उरण परिसराला रानसई धरणातून पाणी पुरवठा केला जातो. जून महिना जवळपास पुरता कोरडाच गेला होता. पावसाने पुन्हा दडी मारल्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र त्यानंतर जुलै महिन्याच्या सुरुवातीपासूनच धरणक्षेत्रात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे आणि डोंगर माथ्यावरून येऊन थेट धरणात मिळणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे रविवारी रात्री १ वाजल्यापासून धरण दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे उरणकरांची पाणी टंचाईचे संकट दूर होण्यास मदत होणार आहे.

### अतिवृष्टीमुळे गुरांचा वाडा कोसळला



**पाताळगंगा :** खालापूर तालुक्यातील वारद गावात अतिवृष्टीमुळे एका शेतकऱ्याच्या गुरांच्या वाड्याची पडझड झाल्याची घटना घडली. सुदैवाने घटना घडली त्यावेळी गुरे चरण्यासाठी बाहेर नेण्यात आली होती. त्यामुळे मोठा अनर्थ टळला असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. वारद येथील शेतकरी निवास शिंदे यांचा गुरांचा वाडा सततच्या मुसळधार पावसामुळे अचानक कोसळला. गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जमिनीने पाणी पूर्णपणे मुरवून घेतले असून माती सैल झाली आहे. त्यामुळे वाड्याचा पाया कमकुवत होऊन संपूर्ण वाडा कोसळल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. घटना घडली त्यावेळी गुरे चरण्यासाठी बाहेर गेली होती. तसेच त्या ठिकाणी कोणीही व्यक्ती नसल्याने जीवितहानी टळली. अन्यथा गुरांसह माणसांच्याही जीवाला धोका निर्माण झाला असता. वाडा कोसळल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून गुरांच्या निवाऱ्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. सध्या खालापूर तालुक्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी घरांच्या भिंती खचणे, झाडे कोसळणे, तसेच जुन्या बांधकामांची पडझड होण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.




### पेण येथे राज्यस्तरीय काव्य संमेलन

**चिरनेर :** कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पेण आणि काव्यप्रेमी मंच पेण (साई तलाव कवी कट्टा) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.५) गांधी मंदिर पेण येथे राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संततधार पाऊस असतानाही जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या कवींनी कार्यक्रमात सहभागी होऊन कवी संमेलनाला शोभा आणली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान साहित्यरत्न प्रा. एल. बी. पाटील त्यांनी भूषविले होते. याप्रसंगी रायगड भूषण म. वा. म्हात्रे, शिक्षणाधिकारी पी. डी. पाटील, शाखाध्यक्ष लवेंद्र मोकल, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पाटील, एन. जे. पाटील साईकट्टा, एस. एस. पाटील. कोमसाप, साईकट्टा, अजय शिवकर, दिनानाथ पाटील, विलास पुंदले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. देवानंद बामणे यांच्या प्रभास या प्रकाशन संस्थेतर्फे दीपक गावंड यांच्या निसर्गगीते आणि शिवाज्ञा आरती यांचे प्रकाशन साहित्यरत्न प्रा.एल.बी. यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक एस.एस. पाटील, आभार लवेंद्र मोकल, स्वागत गीत सुनिता मोरे आणि सूत्रसंचालन अनिल थवई यांनी केले. यावेळी झालेल्या कविसंमेलनात एकूण ५९ कवितांचे सादरीकरण करण्यात आले.



### पनवेल डेपोत प्रवाशांची वर्दळ घटली

**खांदा कॉलनी :** रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसासह जोरदार वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबई-पुणे महामार्गावर दरड कोसळण्याच्या घटना घडत असून अनेक नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत, तर काही नद्या धोक्याच्या पातळीच्या उंबरठ्यावर पोहोचल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल एसटी डेपोमध्ये प्रवाशांची संख्या लक्षणीयरीत्या घटल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अत्यावश्यक कामाशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याने बसस्थानकात नेहमीची गर्दी दिसत नाही. अनेक प्रवाशांनी आपले प्रवास पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. सतत वाढणारा पावसाचा जोर, पूरस्थितीची शक्यता आणि महामार्गावरील धोकादायक परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक काम असल्याशिवाय बाहेर पडू नये, नदी-नाले व पूरग्रस्त भागांपासून दूर राहावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन केले आहे. हवामानातील बदल लक्षात घेता पुढील काही तास नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# निवडक



## संरक्षण भिंत कोसळून दुचाकींचे नुकसान

**पनवेल ग्रामीण :** कळंबोली वसाहतीतील सेक्टर ११ परिसरात वादळी वाऱ्यामुळे मोठी दुर्घटना घडली. हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्थेजवळ सुरू असलेल्या एका इमारतीच्या बांधकामस्थळी उभारण्यात आलेले उंच संरक्षण पत्रे आणि तात्पुरते कंपाऊंड जोरदार वाऱ्याच्या तडाख्याने कोसळल्याने अनेक दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, बांधकामस्थळी उभारण्यात आलेले संरक्षण पत्रे आणि तात्पुरते कंपाउंड वाऱ्याच्या वेगामुळे कोसळून शेजारील हेरंब सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संरक्षक भिंतीवर आदळले. या धडकेमुळे संरक्षक भिंतही कोसळली. भिंतीलगत उभ्या असलेल्या अनेक दुचाकी त्याखाली दबल्या गेल्याने वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने कोसळलेले पत्रे व अवशेष बाजूला करून अडकलेल्या दुचाकी बाहेर काढण्याचे काम केले. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. दरम्यान, माजी नगरसेविका विद्या गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त नागरिकांची विचारपूस केली. संबंधित बांधकाम व्यावसायिकाने नुकसान झालेल्या वाहनांची तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.



## एसटीमधील प्रवाशांची पोलिसांकडून सुटका

**रसायनी :** रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अशाच धोकादायक परिस्थितीत रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील मौजे सारसई येथे कर्जत-पेण मार्गावरील एसटी बस पाताळगंगा नदीच्या पुराच्या पाण्यात अडकली. बसमध्ये एकूण आठ प्रवासी अडकले होते. घटनेची माहिती मिळताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जीवाची पर्वा न करता वेगवान प्रवाहात पोलिसांनी बचावकार्य सुरू केले. या मोहिमेत हेल्प फाऊंडेशन, रसायनीच्या सदस्यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले. पोलिसांनी अत्यंत नियोजनबद्ध आणि धाडसी कारवाई करत बसमधील सर्व आठ प्रवाशांची सुटका केली. यामध्ये ७२ वर्षीय ज्येष्ठ महिलेची पोलीस कर्मचाऱ्याने खांद्यावर घेऊन पुराच्या पाण्यातून सुरक्षित स्थळी नेले. या प्रसंगाने नागरिकांच्या डोळ्यांत कौतुक आणि कृतज्ञतेची भावना निर्माण झाली. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ पोलीस व प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन रसायनी पोलीस ठाण्याने केले आहे.

## न्हावा शेवा पोलीस ठाण्यात शिरले पाणी

**उरण :** उरण शहरासह संपूर्ण तालुक्यात जोरदार पाऊस पडला. या पावसामुळे न्हावा शेवा पोलीस ठाण्यामध्ये पाणी शिरल्याने पोलीसांना कार्यालयीन कामकाज सोडून कार्यालयातून पाणी बाहेर काढण्याचे काम करावे लागले. उरण शहरात जोरदार पाऊस झाल्याने उरण न्यायालय, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय ठिकाणच्या मोकळ्या जागांत तलावसदृष परिस्थिती निर्माण असून वेश्वी, भेंडखळ, म्हातवली गावातील रहिवाशांच्या घरात पुराचे पाणी शिरले असल्याने रहिवाशांची एकच तारांबळ उडाली आहे. या पावसामुळे जेएनपीए बंदर परिसरातील कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याला पाण्याने वेढला आणि सतत कोसळलेल्या पावसामुळे साचलेले पाणी चक्क पोलीस ठाण्याच्या इमारतीत शिरले. यामुळे पोलीस ठाण्याला ही तलावाचे स्वरुप प्राप्त झाले. ठाण्याच्या इमारतीत अचानक पाण्याचा लोंढाच आल्याने पोलीस कर्मचाऱ्यांची एकच तारांबळ उडाली.

## पारगाव डुंगीची तहसीलदारांकडून पाहणी

**नवीन पनवेल :** मागील काही दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे मौजे पारगाव डुंगी येथील घरांमध्ये पाणी शिरून ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. डुंगी गावातील गंभीर परिस्थितीची दखल घेत तहसीलदार पनवेल मीनल भोसले-भामरे यांनी गावाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली व सिडको प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून दि. ६ जुलै २०२६ रोजी सिडको प्रशासनाकडून पारगाव डुंगी गावासाठी तात्पुरत्या पुनर्वसनाचा निधी मंजूर करून घेतला आहे. हा निधी तात्काळ ग्रामस्थांना धनादेशाद्वारे वितरित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. सततच्या पावसामुळे पारपुंड गावातील रहदारी वस्तीतही पूराचे पाणी शिरले. याची माहिती मिळताच तहसीलदारांनी घटनास्थळी भेट देऊन पूरस्थितीची पाहणी केली. तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- अलिबागमध्ये, फार्म हाऊस सांभाळण्यासाठी व जेवणाकरता येणारी स्त्री अथवा पुरूष व्यक्ती पाहिजे. संपर्क : ९४२३८९०२९५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# धाटाव वसाहतीतील रस्ते पाण्याखाली



- कोट्यवधींचा नाला निधी 'पाण्यात'
- अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

गेल्या पाच दिवसांपासून सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रोह्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीला (एमआयडीसी) जलमयतेचा मोठा फटका बसला आहे. वसाहतीमधील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्ते पूर्णपणे पाण्याखाली गेले असून, परिसराला अक्षरशः तलावाचे स्वरूप आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पावसाळ्यापूर्वीच येथील पाण्याचा निचरा व्हावा यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून एका मोठ्या नाल्याचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र, पहिल्याच मोठ्या पावसात हा संपूर्ण खर्च पाण्यात गेला असून, या नवीन नाल्याचा परिसराला काडीमात्र उपयोग झालेला नसल्याचे गेली चार दिवस तुडुंब झालेल्या रस्त्यावरील पाण्यामुळे दिसून आले आहे.

वसाहतीतील कारखानदारांसह कामगारांना सुद्धा तुडुंब पाण्याचा चांगलाच फटका बसला असून येथील जबाबदार अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

औद्योगिक वसाहती अंतर्गत रस्त्यावर काही ठिकाणी झाडे आहेत. मात्र, या झाडांच्या फांद्या पावसाआधी काढलीच नसल्याने सर्व झाडाची झुडपे ही अर्ध्या रस्त्यावर आल्यामुळे वाहनचालकांसह दुचाकी, सायकल स्वारांना रहदारीला अडचणीची ठरत आहेत. बहुतांशी ठिकाणी रस्त्यावरील दिवे बंद अवस्थेत असल्यामुळे आणि रस्त्यावरील झुडपांमुळे अनेक अपघात घडले आहेत. दरम्यान झालेल्या अपघातात अनेक जणांना आपले जीव गमवावे लागले असून काहींना कायमचे अपंगत्व आल्याचे समजते. मात्र, संबंधित अधिकारी वर्गाला याबाबत कशाचेही सोयरसुतक नसल्याचे पहावयास मिळत आहे.

रस्त्यांवर तीन ते चार फूट पाणी साचल्यामुळे कामगारांना गुडघाभर पाण्यातून प्रवास करावा लागला आहे. अनेक लहान-मोठी वाहने पाण्यात बंद पडल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. काही कारखान्यांच्या आवारात आणि गोदामांमध्येही पाणी शिरल्याने कच्चा माल आणि यंत्रसामग्रीचे मोठे नुकसान झाल्याची भीती व्यक्त होत आहे. अब्जावधी रुपयांची उलाढाल असणाऱ्या या औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन प्रक्रियेला या जलमयतेमुळे मोठा ब्रेक लागला आहे. रस्त्यावरील सांडपाण्याच्या चेंबरचे पाणी सुद्धा या पावसाच्या पाण्यात बहुतांशी ठिकाणी मिश्रित झाल्यामुळे अनेकांना याच पाण्यातून वाट काढत प्रवास करताना प्रचंड त्रास सहन करावा लागला. तर अनेकांना पाण्यामुळे अंगावर खाज सुटल्याचे प्रकार घडल्याचे सांगण्यात आले. सर्वत्र पसरलेल्या रंगीबिरंगी पाण्यामुळे औद्योगिक वसाहतीला बकालपणा आल्याचेही समोर आला आहे.

### नियोजनशून्य कारभाराचा फटका

रोहा औद्योगिक वसाहतीतील स्थानिक उद्योजक आणि कामगारांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या भागात रस्ते खाली आणि नाले उंच अशी अत्यंत विचित्र आणि चुकीची तांत्रिक दुरावस्था निर्माण झाली आहे. नाल्याची उंची रस्त्यांच्या पातळीपेक्षा जास्त ठेवल्यामुळे रस्त्यावरील साचलेले पाणी नाल्यात जाण्याऐवजी तुडुंब वाहणाऱ्या नाल्यातील पाणीच रस्त्यावर साठून राहत आहे. अभियांत्रिकीचा कोणताही ताण न घेता केलेल्या या नियोजनशून्य कामामुळे आज संपूर्ण औद्योगिक वसाहतीला याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**। तळा । प्रतिनिधी ।**



गेल्या आठवडाभरापासून मुसळधार कोसळणाऱ्या पावसामुळे तळा तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. सतत कोसळणाऱ्या पावसाने तळा तालुक्याला चांगलेच झोडपले असून तालुक्यातील नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे. यामुळे प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान खात्याने जिल्ह्याला रेड अलर्ट जाहीर केल्याप्रमाणे दिवस रात्र पावसाने जोरदार बरसने सुरू केले. यामुळे तालुक्यातील नद्या, नाले, विहिरी, धबधबे तुडुंब भरून वाहत आहेत. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास तालुक्यातील नद्यांना पूर येऊन गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही ठिकाणी झाडे कोसळून रस्ते वाहतूक बंद झाली तर सोसाट्याच्या वाऱ्यामुळे काही ठिकाणी घराचे छप्पर उडण्याच्या घटना देखील घडल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने बाजारपेठ बंद करण्याचे आवाहन करतानाच नागरिकांना सतर्क राहण्याचेही आवाहन केले. तसेच पुलावरून पाणी जात असल्यास पुलावरून प्रवास करू नये, नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, घरामध्ये पाणी शिरून पाण्याची पातळी वाढत असल्यास तात्काळ घर सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, आपल्या पाळीव प्राण्यांना अगोदरच सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे, मुसळधार पावसामुळे घराच्या आजूबाजूला विजेचे खांब,विद्युत वाहिनी, झाडे पडण्याची शक्यता असल्याने आपत्कालीन मदत आवश्यक असल्यास ग्रामपंचायत, नगरपंचायत किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाताळगंगेत सोडले रसायनयुक्त पाणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

औद्योगिक परिसरातील काही कंपन्यांनी मुसळधार पावसाचा फायदा उचलत काही कंपन्यांकडून रसायन पाताळगंगा नदी व नाल्यामध्ये सोडल्याने पाण्याला लाल-गुलाबी रंगांचे आले. तसेच पाण्यावर तेळकट तवंग आल्याने नदीकाठावरील गावात राहणाऱ्या नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. मुसळधार पावसाचा गैरफायदा घेत केमिकल माफियांकडून नदीपात्रात विषारी रासायनिक सांडपाणी सोडले जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. मात्र, याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मुसळधार पावसात जाणीवपूर्वक रसायन नाल्यावाटे रात्री आणि पहाटेच्या सुमारास पाणी सोडल्याने पाण्याचा रंग बदलला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि लोकप्रतिनिधी या गंभीर प्रकाराची दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करणार का? असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.

# घरावर झाड पडून नुकसान

**। उरण । प्रतिनिधी ।**



उरण पूर्व विभागातील हनुमान मंदिराजवळ असलेले अनेक वर्षा पूर्वीचे वडाचे झाड पडून हनुमान मंदिराचा शेड व घनश्याम म्हात्रे यांच्या घरावर झाड पडल्याने घराचे मोठे नुकसान झाले आहे.

या घटनेची वार्ता समजताच सिडकोचे फायरब्रिगेड उरण यांनी वेळीच घटना स्थळी अधिकारी केशव मोहिते पिरकोन तलाठी पिरकर उरण पंचायत समिती सदस्या प्रारंभी गावंड यांनी घटनेची पाहणी केली.

फायरब्रिगेडच्या जवानांनी व पाले ग्रामस्थांच्या सहकाऱ्यांनी घरावर पडलेले झाड शिताफीने काढले. सुदैवाने शाळेला सुट्टी असल्याने जीवित हानी टळली आहे.

# रेवदंडा पंचक्रोशीत भात लावणी सुरु

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा पंचक्रोशीत भात लावणीच्या कामांना वेग आला आहे. चौल, बेलोशी, रामराजे, महाजने, वावे, खानावळ, वेळवली, चिंचोटी, वरंडे, देवघर, बोर्ली, वळके, रामराज, चोरढे, मिठेखार, काकळघर, भोईघर, आमली, महाळुंगे आदी गावांमध्ये शेतकरी भात लावणीला जोरदार सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे भातशेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता झाल्यामुळे शेतकरी कुटुंबीयांसह महिला व मजुरांच्या सहभागातून लावणीची लगबग पाहायला मिळत आहे.



भात पिकासाठी पोषक वातावरणनिर्माणझाल्यामुळेचांगल्या उत्पादनाची अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास पंचक्रोशीतील उर्वरित क्षेत्रातील भात लावणीची कामेही लवकर पूर्ण होतील, असा विश्वास शेतकरी व्यक्त करीत आहेत. सध्या गावागावांतील शिवार हिरवाईने नटू लागले असून पारंपरिक पद्धतीने सुरू असलेल्या भात लावणीमुळे ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पाच्छापूर रस्त्यावर रंगली अनोखी 'सहल'

## कागदी होड्या, फलक हाती घेत वेधले शासनाचे लक्ष

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**



सुधागड तालुक्यातील पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर या सहा किलोमीटर रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नऊ गाव संघर्ष समिती आणि स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने रविवारी (दि.५) एक अत्यंत आगळीवेगळी आणि उपहासात्मक पिकनिक साजरी करण्यात आली. सोशल मीडियावर काही दिवसांपूर्वी व्हायरल झालेल्या चंद्रावरील पिकनिकला चला या आवाहनाला प्रतिसाद देत, परिसरातील शेकडो नागरिक, महिला व तरुण भर पावसात या अनोख्या सहलीमध्ये सहभागी झाले होते.

सकाळपासूनच पाच्छापूर परिसरात पावसाने दमदार हजेरी लावली होती. मात्र, पावसाची पर्वा न करता महिला आणि तरुण वर्ग हातात विविध संदेश लिहिलेले फलक घेऊन रस्त्यावर उतरले होते. या फलकांच्या माध्यमातून प्रशासकीय अनास्थेवर अतिशय मार्मिक आणि खोचक टिप्पणी करण्यात आली होती. रस्त्यावरील विवरासारख्या मोठ्या खड्ड्यांकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता, ग्रामस्थांनी या खड्ड्यांचा वापर पर्यटनाचे केंद्र म्हणून केला.

या सहलीदरम्यान ग्रामस्थांनी रस्त्यावरील विस्तीर्ण खड्ड्याला फुलांनी सुंदर सजवले आणि त्याची रीतसर पूजा करून आरती केली. खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यात लहान मुलांनी कागदी होड्या सोडल्या, तर तरुण थेट चिखलमय पाण्यात बसले. त्यांनी एकमेकांवर पाणी उडवून वॉटर स्पोर्ट्सचा मनमुराद आनंद लुटला.

प्रशासनाला कोणतीही दूषणे न देता किंवा नेहमीच्या मार्गाने घोषणाबाजी न करता, केवळ एका सहलीच्या आणि फलकांच्या माध्यमातून नऊ गावांतील जनतेने दाखवलेली ही एकजूट संपूर्ण रायगड जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे.



# मुरुडमधील शेती पाण्याखाली

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यात १४४० मिमि पाऊस पडला असून या मुसळधार पावसाने अनेक ठिकाणची भात शेती पाण्याखाली गेली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून उभ्या पिकांना फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र असुन या क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांनी मागील महिन्यात सुर्वणा, जया, रुपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत या जातीच्या भाताची पेरणी केली होती. परंतु, सतत १० दिवस धुवाधार पाऊस पडत असल्याने शहरांसह पंचक्रोशी भागातील शेतात पाणीच पाणी साचून राहिल्याने शेती पुर्णतः पाण्याखाली गेली आहे. जर पाऊस आणखी काही दिवस कायम राहिल्यास राब कुजण्याची शक्यता वाढली आहे, यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

**खड्डे भरण्यासाठी सिमेंट, ग्रीट, खडीचा वापर** | **चिखलातून करावा लागतो प्रवास**

# पालीत पहिल्याच पावसात रस्त्यांची दुरवस्था

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**



पाली शहरातील रस्त्यांची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली असून नगरपंचायत प्रशासनाकडून खड्डे बुजवण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना उपचारापेक्षा उपाय भयंकर अशी ठरत आहे. रस्त्यांवरील मोठमोठाले खड्डे डांबरीकरण करून भरण्याऐवजी निव्वळ सिमेंट, ग्रीट आणि खडी वापरून बुजवण्यात आले होते. मात्र, पहिल्याच काही पावसांत हे मटेरियल बाहेर निघाल्याने व वाहून गेल्याने खड्ड्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांची गैरसोय झाली आहे. शिवाय अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

पाली शहरातील जुने बस स्टँड, हटाळेश्वर चौक, मिनीडोअर स्टॅन्ड आणि गांधी चौक अशा मुख्य व गजबजलेल्या ठिकाणी तसेच इतरही ठिकाणी सध्या मोठमोठाले खड्डे पडले आहेत. या मुख्य चौकातून दिवसभर भाविकांसह शेकडो वाहनांची आणि नागरिकांची ये-जा सुरू असते. मात्र, रस्त्यांच्या या दुरवस्थेमुळे वाहन चालवताना चालकांची मोठी तारांबळ उडत आहे. वाहने रस्त्यातील खड्ड्यात आपटत आहेत. वाहतूक कोंडीत भर पडण्यासोबतच दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे.

येथील सरकारी रुग्णालय आणि श्री बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य तिठ्यावर (नाक्यावर) एक प्रचंड मोठा खड्डा पडला होता. प्रशासनाने काही दिवसांपूर्वी या खड्ड्यात सिमेंट आणि खाडी टाकून तो तात्पुरता बुजवला खरा; मात्र अवजड वाहनांची वर्दळ आणि पाऊस यामुळे हे मिश्रण उखडून रस्ता पूर्ववत झाला आहे.

> "नगरपंचायतने खड्डे बुजवण्यासाठी वापरलेली पद्धत अत्यंत चुकीची आहे. डांबरीकरण करून खड्डे भरायला हवे होते. आणि विशेष म्हणजे पाऊस इतका लांबल्याने हे सर्व करण्यास खूप वेळ होता. मात्र पावसामुळे आता ग्रीट आणि खडी हळूहळू रस्त्यावरून वेगळी होऊ लागली आहे, आता तर काही ठिकाणी चक्क माती टाकली आहे. ज्यामुळे दुचाकी वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे."
>
> -कपिल पाटील,
> सामाजिक कार्यकर्ते, पाली

